


# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

# राहुरी - ४१३ ७२२. जि.अहिल्यानगर (महाराष्ट्र)

## कृषि तंत्रज्ञान शिक्षण विद्या शाखा

### पदविका प्रवेश माहिती पुस्तिका: सन २०२५-२०२६

## कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम
## (२ वर्ष - मराठी माध्यम)
## व
## कृषि तंत्र निकेतन अभ्यासक्रम
## (३ वर्ष - पूर्ण इंग्रजी माध्यम - सहा सत्र)

संकेतस्थळ व लिंक:

संकेतस्थळ : **www.mpkv.ac.in**
ऑनलाईन प्रवेश अर्जाकरीता लिंक: **mpkv.diplomaadmission.com**

दुरध्वनी क्रमांक व ई मेल:

कृषि तंत्रज्ञान शिक्षण : ०२४२६ -२४३२६३
ई मेल :**adlaempkv2012@gmail.com**

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ,
# राहुरी - ४१३ ७२२. जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र).

## कृषि तंत्रज्ञान शिक्षण विद्या शाखा

### कृषि विद्यापीठाचे अधिकारी

| अ.न. | पद | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| १ | अधिष्ठाता (कृषि) तथा संचालक शिक्षण | (०२४२६) २४३२०६ |
| २ | कुलसचिव | (०२४२६) २४३२१६ |
| ३ | सहयोगी अधिष्ठाता (कृतंशि) | (०२४२६) २४३२६३ |
| ४ | उप-कुलसचिव (विद्या) | (०२४२६) २४३२१५ |

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशिल | पृ.क्र. |
|---|---|---|
| १ | कृषि तंत्रज्ञान शिक्षण - प्रस्तावना | ४ |
| २ | कृषि विद्यापीठातील कार्यक्षेत्रातील जिल्हे | ४ |
| ३ | पदविका अभ्यासक्रम, कालावधी, प्रवेश क्षमता व शैक्षणिक पात्रता | ४ |
| ४ | महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत शासकीय /संलग्न अनुदानीत/कायम विनाअनुदानीतखाजगी कृषि तंत्र विद्यालयांची तथा कृषि तंत्र निकेतन यादी. | ५ |
| ४.१ | शासकीय /संलग्न अनुदानीत कृषि तंत्र विद्यालय (दोन वर्षे-मराठी माध्यम) | ५ |
| ४.२ | कायम विनाअनुदानीत खाजगी कृषि तंत्र विद्यालये (दोन वर्षे-मराठी माध्यम) | ६ - १० |
| ४.३ | शासकीय तथा विद्यापीठ अनुदानीत कृषि तंत्र निकेतन (सहा सत्र-इंग्रजी माध्यम) | ११ |
| ४.४ | कायम विनाअनुदानीत खाजगी कृषि तंत्र निकेतन (सहा सत्र-इंग्रजी माध्यम) | ११-१२ |
| ५ | कृषि तंत्र पदविका / कृषि तंत्र निकेतन अभ्यासक्रमासाठी प्रवेश क्षमता | १३ |
| ६ | कृषि तंत्र पदविका / कृषि तंत्र निकेतन अभ्यासक्रमांचा उद्देश | १३ |
| ७ | कृषि तंत्र पदविका व कृषि तंत्र निकेतन अभ्यासक्रमाबाबतच्या विशेष सूचना | १३ |
| ८ | कृषि तंत्र पदविका/कृषि तंत्र निकेतन अभ्यासक्रमासाठी प्रवेश अर्ज भरण्याबाबत उमेदवारांसाठी सुचना | १३-१७ |
| ९ | कृषि तंत्र पदविका / कृषि तंत्र निकेतन अभ्यासक्रम प्रवेश कार्यपध्दती | १७ |
| १० | कृषि तंत्र पदविका /कृषि तंत्र निकेतन अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया कार्यक्रम पत्रिका | १९ |
| ११ | प्रवेश रद्द केल्यानंतर शुल्क परतावा | २० |
| १२ | विद्यार्थ्यांची वर्तणूक व शिस्त | २० |
| १३ | शिष्यवृत्ती व सवलती | २० |
| १४ | आरक्षित जागा | २१ |
| १५ | गुणाधिभार | २२ |
| १६ | कृषि तंत्र पदविका / कृषि तंत्र निकेतन अभ्यासक्रमांचे शुल्क | २३-२५ |
| १७ | प्रवेशाकरीता तपासावयाच्या कागदपत्रांची सूची (Check List) | २६-२७ |
| १८ | परिशिष्टे | २८-३३ |

## कृषि तंत्रज्ञान शिक्षण

### १. प्रस्तावना

१.१ महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये उच्च शिक्षणाबरोबर कृषी तंत्रज्ञान शिक्षण देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. आधुनिक शिक्षणाच्या संकल्पनेनुसार शेतकरी युवक-युवतींनी कृषि व्यवस्थापनाबरोबर दैनंदिन जीवनाला कसे सामोरे जावे हे कृषी तंत्रज्ञान शिक्षण अभ्यासक्रमामध्ये शिकविले जाते. या शिक्षणामुळे कृषक जीवनातील कर्तव्ये कुशलतेने कशी पार पाडावीत याची जाण होते. कृषि शिक्षणाद्वारे त्यांचा सांस्कृतिक, मानसिक, बौध्दीक, आध्यात्मिक व आर्थिक विकास होऊन त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होतो. या आत्मविश्वासातून नागरिक आणि गृहजीवन कर्तव्ये, सामाजिक आणि आर्थिक कार्ये तसेच भावी पालक या नात्याने जबाबदा-या कशा पार पाडाव्यात याचे ज्ञान देण्याचा प्रयत्न केला जातो. माती व पाणी परिक्षण, पीक संवर्धन, शेळी-मेंढी पालन, दुग्धोत्पादन, फलोत्पादन, पशुसंवर्धन, कुक्कुटपालन, मधुमक्षिकापालन, रेशीम उत्पादन, कृषि व्यवस्थापन व विपणन, इ. संबंधी प्रात्यक्षिकाद्वारे विद्यार्थ्यांना परिपूर्ण व्यावसायभिमूख शिक्षण देण्याचा प्रयत्न केला जातो.

कृषि परिषदेच्या दिनांक १२.०६.२०१९ रोजी झालेल्या ९९ व्या बैठकीतील ठराव क्रं. ३/९९/२०१९ नुसार कृषी परिषदेने नियुक्त केलेल्या अधिष्ठाता (कृषी), मफुकृवि, राहुरी यांच्या अध्यक्षतेखाली समितीने सादर केलेला अहवाल विचारात घेऊन, गुजरात राज्यातील कृषी तंत्र निकेतन अभ्यासक्रमाच्या धर्तीवर कृषि तंत्र निकेतन अभ्यासक्रम (इंग्रजी माध्यम, तीन वर्ष कालावधी) हा अभ्यासक्रम राज्यातील चारही कृषी विद्यापीठांमध्ये सुरु करणेस कृषी परीषदेने मान्यता प्रदान केली आहे. तदनुषंगाने, पत्र क्रमांक जा.क्र./मकृप/शिक्षण - १/प्र.क्र. १३२०/ १०४९ / २०२०, दिनांक १५.०७.२०२० कृषि परीषदेच्या दिनांक ०३.०७.२०२० रोजी संपन्न झालेल्या बैठकीतील ठराव क्रमांक ११/१०३/२०२० नुसार महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत सतत 'अ' दर्जा प्राप्त असणा-या एखाद्या संस्थेस सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षापासून प्रायोगिक तत्त्वावर गुजरात धर्तीवर तीन वर्ष कालावधीचा पूर्ण इंग्रजी माध्यमाचा कृषी तंत्र निकेतन अभ्यासक्रम सुरु करणेस कृषि परीषदेने मान्यता प्रदान केली आहे.

**१.२** कृषि परीषदेच्या ९८ व्या बैठकीतील ठराव क्रमांक ४/९८/२०१९ नुसार राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदविका अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सन २०१९ - २०२० या शैक्षणिक वर्षापासून संबधित कृषि विद्यापीठस्तरावर करण्यास कृषी परिषदेने मान्यता दिलेली आहे.त्यानुसार विद्यापीठ स्तरावर सदरची प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

### २. कृषि विद्यापीठाचे कार्यक्षेत्रातील जिल्हे - पश्चिम महाराष्ट्रातील दहा जिल्हे

अहिल्यानगर, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगांव, पुणे, सोलापूर, सातारा, सांगली आणि कोल्हापूर

### ३. पदविका अभ्यासक्रम, कालावधी आणि शैक्षणिक पात्रता

| अ.क्र. | अभ्यासक्रम | कालावधी | विद्यालय निहाय प्रवेश क्षमता | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|---|
| १ | **कृषि तंत्र पदविका** (पूर्ण मराठी माध्यम) | दोन वर्ष | ६० | अर्जदार महाराष्ट्रातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांन्त परीक्षा मंडळाची माध्यमिक शालांत परीक्षा इयत्ता १० वी **किंवा** समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असावा. |
| २ | **कृषि तंत्र निकेतन** (पूर्ण इंग्रजी माध्यम-सहा सत्र) | तीन वर्ष | ४० | |

**४. कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम (२ वर्ष - मराठी माध्यम) कृषि तंत्रनिकेतन अभ्यासक्रम (३ वर्ष - इंग्रजी माध्यम )**

## ४. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत शासकीय /संलग्न अनुदानीत/कायम विनाअनुदानीत खाजगी कृषि तंत्र विद्यालयांची तथा कृषि तंत्र निकेतन यादी.

### ४.१ शासकीय /संलग्न अनुदानीत कृषि तंत्र विद्यालय (दोन वर्षे -मराठी माध्यम)

| अ. क्र | कृषी तंत्र विद्यालयाचे व प्राचार्याचे नांव | सांकेतांक क्रमांक | प्रवेश क्षमता | दुरध्वनी/ भ्रमणध्वनी क्रमांक | ई - मेल | जिल्हयाचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कृषि तंत्र विद्यालय, पुणतांबा, ता.राहाता, जि. अहिल्यानगर<br>प्राचार्य : डॉ. पी.बी.खर्डे | १०१ | ६० | (०२४२३) २७४२२४<br>८२७५०३३८२२ | atspuntamba@gmail.com | अहिल्यानगर |
| २ | कृषि तंत्र विद्यालय, धुळे, जि. धुळे<br>प्राचार्य : प्रा. आर.टी.सुर्यवंशी | २०१ | ६० | (०२५६२) २९५२५६<br>९४२२७७९९३० | atsdhule@gmail.com | धुळे व नंदुरबार |
| ३ | कृषि तंत्र विद्यालय, जळगांव, निमखेडी रोड, जि.जळगांव,<br>प्राचार्य :डॉ. वाय.जी.पाटील | ३०१ | ६० | (०२५७) २२५२९५०<br>९४२०३८७३३३ | ktvjalgaon@gmail.com | जळगांव |
| ४ | शाहू कृषि तंत्र विद्यालय, सैनिक दरबार हॉलच्या समोर, लाईनबाजार, कसबा बावडा, कोल्हापूर, जि.कोल्हापूर<br>प्राचार्य : डॉ. एस.एस. नेवरे | ४०१ | ६० | (०२३१) २६०१८४६<br>९४०५२३७३७३ | psatskolhapur@gmail.com | कोल्हापूर |
| ५ | कृषि तंत्र विद्यालय, मालेगांव, ता.मालेगाव, जि.नाशिक<br>प्राचार्य : प्रा. एच.के. जाधव | ५०१ | ६० | (०२५५४)२५६४५१,<br>७०६६०३११८७<br>९०२१५८५४२१ | atsmalegaon1955@gmail.com | नाशिक |
| ६ | कृषि तंत्र विद्यालय, मांजरी फार्म, ता.हवेली, जि.पुणे<br>प्राचार्य:श्रीमती एस.जी. नवसुपे | ६०१ | ६० | (०२०) २६९९६५५७<br>९९२२७४४७७४ | atsmanjrifarm@gmail.com | पुणे |
| ७ | कृषि तंत्र विद्यालय, कसबे डिग्रज, ता.मिरज, जि.सांगली<br>प्राचार्य : डॉ. एम.डी. माळी | ७०१ | ६० | (०२३३) २४३७२७९<br>९४०३७७३६१४ | atskdigraj1@gmail.com | सांगली |
| ८ | कृषि तंत्र विद्यालय, बोरगांव, ता.जि.सातारा<br>प्राचार्य : प्रा. एम.एस. शिर्के | ८०१ | ६० | (०२१६२) २९५६३५<br>९८५०६१३६४०,<br>९८२२४१८५११ | patsborgaon@yahoo.com | सातारा |
| ९ | कृषि तंत्र विद्यालय, ९१, भवानी पेठ, सोलापूर, ता. जि.सोलापूर<br>प्राचार्य : श्री. जे. बी. पाटील | ९०१ | ६० | (०२१७) २३७३७०३<br>९४०३४९७७७५ | atssolapur@yahoo.in | सोलापूर |

### ५. कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम (२ वर्ष - मराठी माध्यम) कृषि तंत्रनिकेतन अभ्यासक्रम (३ वर्ष - इंग्रजी माध्यम )

**भाग - अ - कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम दोन वर्षे -मराठी माध्यम**

## ४.२ कायम विनाअनुदानीत खाजगी कृषि तंत्र विद्यालये (दोन वर्षे -मराठी माध्यम)

| जिल्हा -अहिल्यानगर (१० विद्यालये) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | कृषि तंत्र विद्यालयाचे नाव | सांकेतांक क्रमांक | प्रवेश क्षमता | दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक | ई - मेल | गुणवत्ता / श्रेणी |
| १ | कृषि तंत्र विद्यालय, भेंडा, ता. नेवासा जि. अहिल्यानगर | १०३ | ६० | ९६३७९६६११७ | atsbhenda1995@gmail.com | ब |
| २ | कृषि तंत्र विद्यालय, आदिनाथनगर, ता.पाथर्डी जि.अहिल्यानगर | १०४ | ६० | (०२४२८)२४५४४५<br>९८५०१७६७२२ | atsadinathnagar@gmail.com | ब |
| ३ | कृषि तंत्र विद्यालय, वाळुंज, ता, जि.अहिल्यानगर | १०६ | ६० | ९४२३८७५७८७/<br>८७६६५८४११८ | apswalunj@gmail.com | ब |
| ४ | कृषि तंत्र विद्यालय, घारगांव, ता.कर्जत जि.अहिल्यानगर | १०७ | ६० | ९०२१९७७८१६ | bhujbalashok9@gmail.com | ब |
| ५ | कृषि तंत्र विद्यालय, सुपा, ता. पारनेर, जि.अहिल्यानगर | १०९ | ६० | ९७६३४७५६६२ | ganeshrkale9763@gmail.com | ब |
| ६ | कृषि तंत्र विद्यालय, मिरजगाव, ता.कर्जत जि.अहिल्यानगर | ११० | ६० | ९६८९९५५६६७ | apsmirajgaon@gmail.com | ब |
| ७ | कृषि तंत्र विद्यालय, सिध्दटेक बेरडी,ता.कर्जत,जि.अहिल्यानगर | ११३ | ६० | ८६००६८६७७५/<br>९५५२४७८३१३ | siddhivinayakaagri2004@gmail.com | ब |
| ८ | कृषि तंत्र विद्यालय, डोळासणे, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर | ११४ | ६० | ७५८८०९४६४२ | ktndolasane@gmail.com | ब |
| ९ | कृषि तंत्र विद्यालय, टाकळी ढोकेश्वर, ता.पारनेर जि.अहिल्यानगर | ११५ | ६० | ९५५२५२२१६९/<br>९३०९८६३४०६ | sampadaagripoly@gmail.com | ब |
| १० | कृषि तंत्र विद्यालय, पांढरेवाडी, ता. श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर | ११७ | ६० | ९७६५८१५३१९ | bharatkumbhar10@gmail.com | ब |

| जिल्हा-धुळे (०६ विद्यालये) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | कृषि तंत्र विद्यालयाचे नाव | सांकेतांक क्रमांक | प्रवेश क्षमता | दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक | ई - मेल | गुणवत्ता / श्रेणी |
| १ | कृषि तंत्र विद्यालय, बोराडी, ता.शिरपूर, जि.धुळे | २०२ | ६० | ९६२३२९८९४३ | maheshwarimk@rediffmail.com | क |
| २ | कृषि तंत्र विद्यालय, साक्री, ता.साक्री, जि.धुळे | २०४ | ६० | ७६२०८५०१२६ | krushitantrasakri2000@gmail.com | अ |
| ३ | कृषि तंत्र विद्यालय, मेहरगाव, ता. जि.धुळे | २०९ | ६० | ९४२०८१३०८३ | krushividyalaymehergaon@gmail.com | ब |
| ४ | कृषि तंत्र विद्यालय, उमर्दे, ता. जि. नंदुरबार | २१२ | ६० | ९४२३५६४९५६ | ktniketanumarde@rediffmail.com | ब |
| ५ | कृषि तंत्र विद्यालय, मंदाणे, ता.शहादा, जि.नंदुरबार | २१३ | ६० | ९४०४५७७८५७/ ९३७०६४३८६४ | waghsuresh78@yahoo.in | अ |
| ६ | कृषि तंत्र विद्यालय, रांझणी, ता.तळोदा, जि.नंदुरबार | २१४ | ६० | ९४२३९४३३९१ | jainpravin022@gmail.com | अ |

| जिल्हा -जळगाव (१२ विद्यालये) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | कृषि तंत्र विद्यालयाचे नाव | सांकेतांक क्रमांक | प्रवेश क्षमता | दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक | ई - मेल | गुणवत्ता / श्रेणी |
| १ | कृषि तंत्र विदयालय, चोपडा, ता.चोपडा, जि.जळगांव | ३०२ | ६० | (०२५८६) २२३६९३ ७५८८०५३७१२ | agripolychopda@gmail.com | क |
| २ | कृषि तंत्र विद्यालय, अमळनेर ता.अमळनेर, जि.जळगाव | ३०३ | ६० | ७७६८०२३१०१ ९९६०३६२१६३ | navalbhaukrushiv@gmail.com | ब |
| ३ | कृषि तंत्र विदयालय, किनगाव ता.यावल, जि.जळगाव | ३०४ | ६० | ७०३०१८५१७० | ktvkingaon23@gmail.com | ब |
| ४ | कृषि तंत्र विदयालय, डिक्साई, ता.जि.जळगाव | ३०५ | ६० | ८०८०५००३३२/ ९९७५०४९६८६ | atsdiksai@gmail.com | ब |
| ५ | कृषि तंत्र विदयालय, कोल्हे, ता.पाचोरा, जि.जळगाव | ३०६ | ६० | ९०२११४७७७९ | agribafna26@gmail.com | ब |
| ६ | कृषि तंत्र विदयालय, निंभोरा,ता. रावेर, जि.जळगाव | ३०८ | ६० | ९६६५३६५०९४/ ९९२३७९१०७५ | atsnimbhora@gmail.com | अ |
| ७ | कृषि तंत्र विदयालय, मुक्ताईनगर,ता. मुक्ताईनगर, जि.जळगाव | ३०९ | ६० | ९६६५४४६८९२ | a.p.muktainagar@gmail.com | ब |

**७. कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम (२ वर्ष - मराठी माध्यम) कृषि तंत्रनिकेतन अभ्यासक्रम (३ वर्ष - इंग्रजी माध्यम )**

| अ.क्र. | कृषि तंत्र विद्यालयाचे नाव | सांकेतांक क्रमांक | प्रवेश क्षमता | दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक | ई - मेल | गुणवत्ता / श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|
| ८ | कृषि तंत्र विदयालय, पिलखोड, ता.चोपडा, जि.जळगाव | ३१० | ६० | ९८५०६४१५५१/ ९४२१५१९६५७ | ktnpilkhod@gmail.com | अ |
| ९ | कृषि तंत्र विदयालय, अडावद, ता.चोपडा, जि.जळगाव | ३११ | ६० | (०२५८६)२२०५२७ ९४२०२२८०३५ | ktvadavad@gmail.com | क |
| १० | कृषि तंत्र विदयालय, चांदसर, ता.धरणगाव जि.जळगाव | ३१२ | ६० | ९७३०२९२९६१/ ८५५४००३६५१ | agriktnc@gmail.com | अ |
| ११ | कृषि तंत्र विदयालय, पाल, ता.रावेर, जि.जळगाव | ३१४ | ६० | ९८६०६६९१९८/ ९४०५८८०९०६ | ktnpal2014@gmail.com | ब |
| १२ | गौराई कृषि तंत्र विदयालय, वाकोद, ता.जामनेर,जि.जळगाव | ३१५ | ६० | ८३०८०३५९८९ | gktnwakod@gmail.com | अ |
| **जिल्हा -कोल्हापूर (०६ विद्यालये)** | | | | | | |
| **अ.क्र.** | **कृषि तंत्र विद्यालयाचे नाव** | **सांकेतांक क्रमांक** | **प्रवेश क्षमता** | **दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक** | **ई - मेल** | **गुणवत्ता / श्रेणी** |
| १ | कृषि तंत्र विद्यालय, तळसंदे | ४०४ | ६० | ९४२००५३३९७ | dypaptalsande@gmail.com | ब |
| २ | कृषि तंत्र विद्यालय, तारळे | ४०५ | ६० | ९०२१३३८१०० | saishatrughna726@gmail.com | क |
| ३ | कृषि तंत्र विद्यालय, परिते | ४०९ | ६० | ९७६५७२२३३५ | prinagripolytechparite@gmail.com | ब |
| ४ | कृषि तंत्र विद्यालय, कणेरी मठ ता. करवीर, जि. कोल्हापूर | ४११ | ६० | ९६०७०७९५४९ | ssatskaneri@gmail.com | ब |
| **जिल्हा -नाशिक (०८ विद्यालये)** | | | | | | |
| **अ.क्र.** | **कृषि तंत्र विद्यालयाचे नाव** | **सांकेतांक क्रमांक** | **प्रवेश क्षमता** | **दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक** | **ई - मेल** | **गुणवत्ता / श्रेणी** |
| १ | कृषि तंत्र विद्यालय,मानूर, ता.कळवण | ५०२ | ६० | ९४२०६४८०३८/ ९५९५५०९७९७ | kbhagritechmanur@gmail.com | अ |
| २ | कृषि तंत्र विद्यालय,येवला, ता. येवला | ५०४ | ६० | ८३८१००७७०२ | agripolytech2000@gmail.com | ब |
| ३ | *कृषि तंत्र विद्यालय,सौंदाणे, ता.मालेगाव | *५०५ | ५४ | ८२०८०२४५९६/ ९३०७५६०७१३ | ssktnsaundane2000@gmail.com | ब |

**८. कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम (२ वर्ष - मराठी माध्यम) कृषि तंत्रनिकेतन अभ्यासक्रम (३ वर्ष - इंग्रजी माध्यम )**

| अ.क्र. | कृषि तंत्र विद्यालयाचे नाव | सांकेतांक क्रमांक | प्रवेश क्षमता | दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक | ई - मेल | गुणवत्ता / श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | कृषि तंत्र विद्यालय, चंदनपुरी, ता.मालेगांव | ५०६ | ६० | ९४०३१५९२८१/ ९४२२२६८९०४ | atschandanpuri221@gmail.com | क |
| ५ | कृषि तंत्र विद्यालय,दरेगांव, ता.मालेगांव | ५०७ | ६० | ९१७५०९२१२३, ९५११७८७४०३ | ppkmktvdaregaon@yahoo.in | ब |
| ६ | कृषि तंत्र विद्यालय, चिंचवड, ता.त्र्यंबकेश्वर | ५०८ | ६० | ७०६६६०४०४२/ ९५९५७९८७४४ | agrichinchwad@gmail.com | अ |
| ७ | कृषि तंत्र विद्यालय,बाभुळगांव,ता.येवला | ५०९ | ६० | ७०२८०३५०९५ | ktvbabhulgaon@gmail.com | ब |
| ८ | कृषि तंत्र विद्यालय,बोलठाण,ता.नांदगांव | ५१० | ६० | ९३५६७४००३४/ ७५०७२५७७६२ | ckpagripolytech99@gmail.com | ब |
| **जिल्हा -पुणे (०२ विद्यालये)** | | | | | | |
| **अ.क्र.** | **कृषि तंत्र विद्यालयाचे नाव** | **सांकेतांक क्रमांक** | **प्रवेश क्षमता** | **दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक** | **ई - मेल** | **गुणवत्ता / श्रेणी** |
| १ | कृषि तंत्र विद्यालय, चिंचोली मोराची, ता.शिरुर, जि.पुणे | ६०५ | ६० | ९०११२९६५०० | jaymalhar1111@rediffmail.com | अ |
| २ | कृषि तंत्र विद्यालय, बावडा,ता.इंदापूर, जि.पुणे | ६०७ | ६० | ९८६०४३५०९१ | agripolytech.bawada@gmail.com | ब |
| **जिल्हा -सांगली (०३ विद्यालये)** | | | | | | |
| **अ.क्र.** | **कृषि तंत्र विद्यालयाचे नाव** | **सांकेतांक क्रमांक** | **प्रवेश क्षमता** | **दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक** | **ई - मेल** | **गुणवत्ता / श्रेणी** |
| १ | कृषि तंत्र विद्यालय, करंगुळी आरळा, जि.सांगली | ७०५ | ६० | ७७०९०३२४८३ | ushaarjun12@gmail.com | ब |
| २ | कृषि तंत्र विद्यालय, उमदी,ता.जत, जि.सांगली | ७०६ | ६० | ८८३०३५५३४९ | uktnumadi413@gmail.com | ब |
| ३ | कृषि तंत्र विद्यालय, खानापूर, ता. खानापूर जि.सांगली | ७०७ | ६० | ९२७२१०४८०० | rsmaneatdsk@gmail.com | नवीन मान्यता असल्याने श्रेणी दर्शविलेली नाही. |

**९. कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम (२ वर्ष - मराठी माध्यम) कृषि तंत्रनिकेतन अभ्यासक्रम (३ वर्ष - इंग्रजी माध्यम )**

| जिल्हा -सातारा (०१ विद्यालय) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | कृषि तंत्र विद्यालयाचे नाव | सांकेतांक क्रमांक | प्रवेश क्षमता | दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक | ई - मेल | गुणवत्ता/ श्रेणी |
| १ | कृषि तंत्र विद्यालय, रहिमतपूर, ता.कोरेगाव,जि.सातारा | ८०७ | ६० | ९८९०९१२६२८/ ९८६०९३२०६५ | sdmaps@rediffmail. com | क |
| जिल्हा - सोलापूर (०६ विद्यालये) | | | | | | |
| १ | कृषि तंत्र विद्यालय, गौडगाव, ता.बार्शी जि.सोलापूर | ९०३ | ६० | ७५८८७९७४३४/ ९६६५५८३४३७ | kuldipsonawane036@gmail.com | ब |
| २ | कृषि तंत्र विद्यालय, अकलुज, ता.माळशिरस, जि.सोलापूर | ९०२ | ६० | ९६३७८९८९४८/ ९६६५३६९८९६ | agri.tech@rediffmail.com | क |
| ३ | कृषि तंत्र विद्यालय, अनगर, ता.मोहोळ जि.सोलापूर | ९०४ | ६० | ९७६३२१७४८९/ ९८३४७९९८९४ | anagarkrishi2001@gmail.com | क |
| ४ | कृषि तंत्र विद्यालय, बार्शी, ता.बार्शी जि.सोलापूर | ९०६ | ६० | (०२१८४)२२९३६४/ ९४०५५४८७२७ | kktn2130barshi@gmail.com | अ |
| ५ | कृषि तंत्र विद्यालय, बोराळे, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर | ९१० | ६० | ९९७५७९९९२१ | kshrkborale@gmail.com | ब |
| ६ | कृषि तंत्र विद्यालय, कडलास, ता.सांगोला, जि. सोलापूर | ९१२ | ६० | ७३८७१३१४०३/ ९४२३८०८८७७ | agrikadlas@gmail.com | अ |

*** उपरोक्त विनाअनुदानीत कृषि तंत्र विद्यालयांचे गुणवत्ता / श्रेणी ही शैक्षणिक वर्ष २०२० - २१ व २०२१ -२२ मध्ये झालेल्या पुनर्मुल्यांकन / पुर्नमान्यता अहवालानुसार दर्शविलेली आहे.**

## भाग - ब - कृषि तंत्र निकेतन अभ्यासक्रम (सहा सत्र -इंग्रजी माध्यम)

### ४.३ शासकीय तथा विद्यापीठ अनुदानीत कृषि तंत्र निकेतन (सहा सत्र -इंग्रजी माध्यम)

| जिल्हा -नाशिक (०१ तंत्र निकेतन) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | कृषि तंत्र निकेतनचे नाव | सांकेतांक क्रमांक | प्रवेश क्षमता | दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक | ई - मेल | जिल्हा |
| १ | कृषि तंत्र निकेतन, काष्टी, ता. मालेगांव, जि. नाशिक. प्राचार्य : डॉ. एस. बी. नांदगुडे | १००१ | ४० | ९४२२६३५४३३ ९४२१२७४७४२ | agripolytechnickashti@gmail.com | नाशिक |

### ४.४ कायम विनाअनुदानीत खाजगी कृषि तंत्र निकेतन (सहा सत्र -इंग्रजी माध्यम)

| अ.क्र. | कृषि तंत्र निकेतनचे नाव | सांकेतांक क्रमांक | प्रवेश क्षमता | दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक | ई - मेल | जिल्हा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कृषि तंत्र निकेतन, मालदाड,ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर | १००३ | ४० | ९४२०८६००५५ | shramshaktimaldad@gmail.com | अहिल्यानगर |
| २ | कृषि तंत्र निकेतन, लोणी, ता.राहाता, जि.अहिल्यानगर | १००४ | ४० | ८७६६८८०९६६ | principal.agridairy@pravara.in | अहिल्यानगर |
| ३ | कृषि तंत्र निकेतन, जामगांव, ता. पारनेर,जि.अहिल्यानगर | १००५ | ४० | ७३९७९६१३९५ | apjamgaon.nr@gmail.com | अहिल्यानगर |
| ४ | कृषि तंत्र निकेतन, माळवाडी (बोटा), ता.संगमनेर | १०१८ | ४० | ७५८८०९४६४२/ ८४२१२१०४५७ | ktndolasane@gmail.com | अहिल्यानगर |
| ५ | कृषि तंत्र निकेतन, नारायणगांव, ता.जुन्नर, जि. पुणे | १००६ | ४० | ९७३०८०४७६७/ ९८६०४९२०७० | maliprashikshan@rediffmail.com principalgmkrishi@gmail.com | पुणे |
| ६ | * कृषि तंत्र निकेतन, बारामती, ता. बारामती,जि. पुणे | १००२ | ४० तथापि, (१५ % जागा (०६) व्यवस्थापन कोटयासाठी आहेत) | ९९२१५८७१४३/ ९७३०३६७८२७ | agripolybaramati@rediffmail.com | पुणे |

| अ.क्र. | कृषि तंत्र निकेतनचे नाव | सांकेतांक क्रमांक | प्रवेश क्षमता | दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक | ई - मेल | जिल्हा |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | कृषि तंत्र निकेतन, एखतपुर, ता. सांगोला, जि.सोलापूर | १००८ | ४० | ९६३७६१४१८१/<br>८३२९४२५१०९ | krushiekhatpur@gmail.com | सोलापूर |
| ८ | कृषि तंत्र निकेतन, वडाळा, ता.उ.सोलापूर, जि.सोलापूर | १००९ | ४० | ९७६३८८५१२२ | lokagridiploma@gmail.com | सोलापूर |
| ९ | *कृषि तंत्र निकेतन, फलटण, ता.फलटण, जि.सातारा | १०१० | ४० | ९८८१२६५९७२/<br>८६२५०२४२४२ | psiaphn@gmail.com | सातारा |
| १० | *कृषि तंत्र निकेतन, खंडाळा, ता.खंडाळा, जि.सातारा | १०११ | ४० | ९८५०११८७२८/<br>९८९०८४४७५३ | rdkapkhandala@gmail.com | सातारा |
| ११ | कृषि तंत्र निकेतन, बनपुरी, ता.पाटण, जि.सातारा | १०१७ | ४० | ९९७५०९६०७५/<br>९९७५२३३२७३ | mokashiagridiploma@gmail.com | सातारा |
| १२ | कृषि तंत्र निकेतन, आटपाडी,ता.आटपाडी, जि.सांगली | १०१२ | ४० | ९९२३९५०१६१ | manganga.krushi@gmail.com | सांगली |
| १३ | *कृषि तंत्र निकेतन, वाकोद, ता.जामनेर,जि.जळगाव | १०१५ | ४० | ८३०८०३५९८९ | gktnwakod@gmail.com | जळगाव |
| १४ | कृषि तंत्र निकेतन, नाशिक, जि.नाशिक | १०१६ | ४० | (०२५३)२३११०९८/<br>८००७९११९३३ | agri.polytechnicnashik@gmail.com | नाशिक |
| १५ | कृषि तंत्र निकेतन, गारगोटी, जि.कोल्हापूर | १०१४ | ४० | ७३५०५७३४६४ | krushitngrt@gmail.com | कोल्हापूर |
| १६ | कृषि तंत्र निकेतन, दत्तवाड-घोसरवाड, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर | १०१९ | ४० | ९३७३१९२१३९/<br>९७६७२४५४७१ | agripolytech123@gmail.com | कोल्हापूर |
| १७ | कृषि तंत्र निकेतन, कागल | १०२० | ४० | ९८९०५८४६२३ | principalapkagal@gmail.com | कोल्हापूर |

*** अशी खुण केलेल्या विनाअनुदानीत कृषि तंत्र विद्यालये / निकेतनांना त्यांनी मागणी केल्याप्रमाणे व शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेनुसार व्यवस्थापन कोटा लागू आहे. तथापि, सदरहू व्यवस्थापन कोटयासाठी ठरविण्यात आलेल्या जागा एकूण प्रवेश क्षमतेच्या जागेतून वजा करुन उर्वरीत जागांसाठी गुणानुक्रमे व शासन निर्णयाप्रमाणे वेळोवेळी ठरविलेल्या आरक्षीत धोरणानुसार भरल्या जातील.**

**उक्त अनुक्रमांक १ ते १७ या विनाअनुदानीत कृषि तंत्र निकेतनांचे पहिले पुर्नमुल्यांकन कार्यक्रम सद्यस्थितीत सुरु असल्याने श्रेणी व गुणवत्ता दर्शविण्यात आलेली नाही.**

**१२. कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम (२ वर्ष - मराठी माध्यम) कृषि तंत्रनिकेतन अभ्यासक्रम (३ वर्ष - इंग्रजी माध्यम )**

**५. प्रवेश क्षमता**

प्रत्येक कृषि तंत्र विद्यालयाची प्रथम वर्ष विद्यार्थी प्रवेश क्षमता **६०** व कृषि तंत्र निकेतनची प्रथम वर्ष विद्यार्थी प्रवेश क्षमता **४०** इतकी आहे.

**६. अभ्यासक्रम उद्देश**

६.१ **कृषि तंत्र पदविका (दोन वर्ष - मराठी माध्यम)**

- शेतकरी व शेत मजुरांच्या मुलांना शेती व तत्सम विषयांचे प्रात्यक्षिकभिमूख शिक्षण देऊन त्यांचा आत्मविश्वास वाढविणे. त्यामुळे ते स्वत:ची शेती करण्यास प्रवृत्त होऊन सुधारीत तंत्रज्ञानाचा वापरामुळे कृषि उत्पादन वाढेल.
- कृषि तंत्र पदविकाधारकांस कृषिपूरक स्वयंरोजगाराभिमूख उद्योगाव्दारे स्वत:च्या रोजगाराची निर्मिती करुन स्वावलंबी होता येईल व त्याव्दारे इतरांना देखील रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.
- कृषि तंत्र पदविकाधारक इतर शेतक-यांना मार्गदर्शक म्हणून कार्य करतील.
- कृषि तंत्र पदविकाधारकास कृषि सहाय्यक म्हणून शासकीय अथवा खाजगी क्षेत्रात सेवा करता येईल.

६.२ **कृषि तंत्र निकेतन (तीन वर्ष -इंग्रजी माध्यम - सहा सत्र)**

महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परीषदेच्या दिनांक २६.१२.२०२३ रोजी झालेल्या ११३ व्या बैठकीतील ठराव क्रमांक ०८/११३/२०२३ दिनांक २६.१२.२०२३ नुसार " कृषि तंत्र निकेतन अभ्यासक्रम (तीन वर्षे - इंग्रजी माध्यम - सहा सत्र) उत्तीर्ण उमेदवारांना बी.एस.सी.(ऑनर्स) कृषि पदवी अभ्यासक्रमाच्या थेट व्दितीय वर्षात, प्रवेश क्षमतेच्या १० टक्के अतिरीक्त जागांवर गुणानुक्रमे देण्यास कार्योत्तर मान्यता दिली आहे. "

**७. कृषि तंत्र पदविका व कृषि तंत्र निकेतन अभ्यासक्रमाबाबतच्या विशेष सूचना**

७.१ अर्जदाराने हा महाराष्ट्रातील विभागातील रहिवाशी असावा.

७.१ अ. कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रमाच्या अर्जदाराना प्रवेश रहिवाशी जिल्हानिहाय दिला जाईल.

७.१ ब. कृषि तंत्र निकेतन अभ्यासक्रमाच्या अर्जदाराना प्रवेश विद्यापीठ कार्यक्षेत्राच्या दहा जिल्हयातून दिला जाईल.

**८. कृषि तंत्र पदविका/कृषि तंत्र निकेतन अभ्यासक्रमासाठी प्रवेश अर्ज भरण्याबाबत अर्जदारांसाठी सुचना**

८.१ अर्जदाराने शैक्षणिक पात्रतेनुसार फक्त एकच प्रवेश अर्ज **www.mpkv.ac.in** संकेत स्थळावर जाऊन फक्त एकच प्रवेश अर्ज **mpkv.diplomaadmission.com** या लिंक वर ऑन लाईन पध्दतीने भरावा. अर्जदाराने एकापेक्षा जास्त प्रवेश अर्ज संकेतस्थळावर दाखल केल्यास शेवटचा दाखल केलेला अर्ज ग्राहय धरण्यात येईल. **अर्जदार कमीत कमी तीन कृषि तंत्र पदविका व कृषि तंत्र निकेतन विद्यालयांकरीता ऑनलाईन अर्ज भरू शकेल (जिल्हाबंदी नियम शिथिल झालेचे शुध्दीपत्रक संकेतस्थळावर निर्गमित झालेनंतर)**. अर्जदार कृषि तंत्र पदविका व कृषि तंत्र निकेतन या दोनही ठिकाणी प्रवेशाकरीता अर्ज करू शकेल, परंतु एकाच अभ्याक्रमास एकापेक्षा जास्त अर्ज भरु शकणार नाही, भरल्यास त्याचा अंतिम अर्ज ग्राह्य धरण्यात येईल.

८.२ प्रवेश अर्जाची प्रत किंवा इतर कोणत्याही कागदपत्रे टपालाने /कुरिअरने किंवा हात बटवडयाने कृषि विद्यापीठ **किंवा** ॲनालायटिका बिझिनेस सोल्युशन्स, पुणे यापैकी कोठेही पाठवू नये.

८.३ संकेतस्थळावर प्रवेश अर्ज भरल्यानंतर स्वाक्षरी, अर्जदाराचे पासपोर्ट आकाराचे सध्याचे स्वत:चे छायाचित्र आणि आवश्यक त्या सर्व मुळ कागदपत्रांच्या प्रती स्कॅन करून लिंक वर अपलोड कराव्यात.

**८.४ खुल्या अर्जदारांसाठी रु. ४००/- तर आरक्षित प्रवर्गातील अर्जदारांसाठी रु.२००/- प्रवेश अर्ज शुल्क आहे. सदरचे शुल्क नेट बँकींग, डेबीट कार्ड किंवा क्रेडीट कार्डव्दारे भरावे. प्रवेश अर्ज भरल्यानंतर असे शुल्क भरण्याची व्यवस्था लिंक वर केलेली आहे. सदरचे शुल्क ना परतावा आहे.**

८.५ कृषि तंत्र पदविका /कृषि तंत्र निकेतन अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतेवेळी प्रवेश घेणा-या अर्जदाराचे वय दिनांक १५.०७.२०२५ रोजी वय ३० वर्षापेक्षा कमी असावे. प्रवेशाच्या वेळी अर्जदाराचे वय ३० वर्षे पूर्ण किंवा त्यापेक्षा अधिक असेल तर अर्जदाराला प्रवेश दिला जाणार नाही. मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वयाची अट ५ वर्षांनी शिथिलक्षम राहील. माजी सैनिकांसाठी प्रवेश घेतेवेळीचे वय ४५ वर्षांपेक्षा कमी असावे.

**अर्जदाराने अर्जासोबत खाली दर्शविलेल्या मुळ कागदपत्रांच्या प्रती स्कॅन करुन संकेतस्थळावर अपलोड कराव्यात.**

८.६ इयत्ता १० वी अभ्यासक्रमाचे मुळ गुणपत्रक (प्रमाणपत्र)

८.७ **विद्यालयाचा / शाळा सोडल्याचा दाखला :** अर्जदार ज्या विद्यालयातून शेवटची परीक्षा उत्तीर्ण आहे त्या विद्यालयाचा मुळ शाळा सोडल्याचा दाखला किंवा उमेदवाराने इतर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला तर त्या विद्यालयाचे /महाविद्यालयाचे बोनाफाईड सर्टिफिकेट (Bonafide Certificate) परंतु एकदा प्रवेश घेतल्यानंतर अर्जदाराने ७ दिवसांच्या आत मुळ शाळा सोडल्याचा दाखला जेथे प्रवेश घेतला असेल तेथे सादर करणे बंधनकारक आहे, अन्यथा त्याचा प्रवेश रदद होऊ शकतो. तसेच, ज्या अर्जदाराचा इयत्ता १० वी, ११ वी, १२ वी नंतर प्रवेश काही कारणाने **शैक्षणिक खंड पडला असेल तर त्या अर्जदारांनी त्यासंबधीचे तहसिलदार यांच्या समोर रु. १००/- स्टॅप पेपरवर केलेले प्रतिज्ञापत्रक (Gap Certificate) सादर करावे.**

८.८ अर्जदाराना १२ टक्के गुणांचा अधिभार मिळण्यास पात्र प्रमाणपत्र

८.८.१ तलाठी / पटवारी यांनी सन २०२५-२०२६ मध्ये दिलेला शेतजमीनीचा ८अ/७/१२ चा उतारा/ खसरा (गाव नमूना) अर्जदाराच्या नांवावर किंवा आई /वडील किंवा आजी /आजोबा यांचे नावे असावा.

८.८.२ यदा कदाचित आई /वडील हयात नसतील तर सदर उतारा त्यांच्या कुटुंब प्रमुखाच्या नांवावर असावा व या परिस्थितीत कुटुंब प्रमुखाचे रु. १००/- च्या मुद्रांकावर प्रतिज्ञापत्र असावे. प्रतिज्ञापत्रकामध्ये सदर अर्जदाराचा उक्त जमीनीमध्ये कायदेशीर हक्क असल्याचे नमूद करण्यात यावे.

८.८.३ अर्जदाराच्या आईचा तिच्या वडीलांकडील शेत जमीनीत वाटा असल्याबाबतचे रु. १००/- च्या मुद्रांकावर तिच्या वडीलांचे प्रतिज्ञापत्र व ८अ/७/१२ उतारा अपलोड केल्यास, असा अर्जदार १२ गुणांचा अधिभार मिळण्यास पात्र राहील.

८.८.४ सदर उतारा मराठी/हिंदी/इंग्रजी भाषेत नसेल तर संबधित राज्यातील राजपत्रित अधिका-याने प्रमाणित केलेले उता-याचे अचूक भाषांतर.

८.८.५ अर्जदारांस सूचित करण्यात येते की, ८अ/७/१२ उता-याच्या आवश्यक तेवढया सत्यप्रती प्रवेशाच्या वेळेस सोबत ठेवाव्यात.

८.८.६ अर्जदाराच्या जमीनीच्या ८अ/७/१२ उता-यामध्ये नोंदविलेल्या नावापेक्षा त्याच्या / तिच्या इयत्ता १० वी च्या गुणपत्रक व प्रमाणपत्रामध्ये असलेले नाव भिन्न असल्यास अशा उमेदवाराने त्याबाबचे प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक राहील.

८.८.७ **भूमिहिन शेतमजूर असल्याबाबचे प्रमाणपत्र :** अर्जदाराचे वडील / पालक भूमिहिन शेतमजूर असल्यास भूमिहिन शेतमजूराचे शेतमजूरी करणे हे उपजिविकेचे साधन असल्याचा उल्लेख प्रमाणपत्रात असणे गरजेचे आहे. हे प्रमाणपत्र तहसीलदार अथवा नायब तहसीलदार यांचे स्वाक्षरी व शिक्कया निशी असावे. सदर प्रमाणपत्राचा नमूना **परीशिष्ट 'अ'** येथे देण्यात आलेला आहे.

८.८.८ **शेतकरी असल्याबाबतचे प्रमाणपत्र:** सन २०२५-२६ या वर्षातील तहसीलदार अथवा नायब तहसीलदार यांनी दिलेले शेतकरी असल्याबाबचे प्रमाणपत्र, या प्रमाणपत्रात अर्जदार त्याचे आई/वडील अथवा आजी / आजोबा (वडीलांचे आई - वडील) हे जमीनधारक किंवा कूळ असून त्या जमीनीव्दारे मिळणारे उत्पन्न हेच त्या कुटुंबाच्या उपजिवीकेचे प्रमुख साधन आहे. असे नमूद केलेले असावे. सदर प्रमाणपत्राचा नमूना **परिशिष्ट 'ब'** येथे देण्यात आलेला आहे. अशा प्रमाणपत्र धारकांस शेतकरी प्रवर्ग (AG Category) लागू असेल.

८.९ **जातीचे प्रमाणपत्र व उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमिलेअर) प्रमाणपत्र:** उप-जिल्हाधिकारी/उप-विभागीय/तहसीलदार/तालुका दंडाधिकारी यांनी विहीत नमुन्यामध्ये दिलेले जातीचे प्रमाणपत्र, विमुक्त जाती- अ, भटक्या जमाती - ब, भटक्या जमाती - क, भटक्या जमाती - ड, इतर मागासवर्गीय व विशेष प्रवर्गातील अर्जदारांनी तहसीलदार, तालुका दंडाधिकारी अथवा विशेष कार्यकारी दंडाधिकारी यापेक्षा कमी दर्जा नसलेल्या सक्षम अधिका-यांनी दिनांक ०१.०४.२०२५ रोजी किंवा त्यानंतर दिलेले किंवा अर्ज ज्या दिनांकास दिला असेल त्या दिनांकास ग्राहय असलेले उत्पन्न व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमिलेअर) प्रमाणपत्र असावे.

८.१० **प्रकल्पग्रस्त असल्याबाबतचा दाखला :** महाराष्ट्रातील जिल्हा पुनर्वसन अधिकारी (District Rehabilitation/Resettlement Officer) यांनी उमेदवार / वडील हे प्रकल्पग्रस्त आहेत व त्याचे / तिचे वडिलांची /पालकांची किंवा आजोबांची शेतजमीन महाराष्ट्रातील कृषि विद्यापीठे /पाटबंधारे /वीज /संरक्षण प्रकल्प या विभागासाठी संपादित केलेली /झालेली आहे असे प्रमाणित केलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. सक्षम अधिका-याने दिलेल्या प्रकल्पग्रस्ताच्या प्रमाणपत्रावर या सवलतीचा फायदा ज्यांना द्यावयाचा आहे, त्याच्या नांवाचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

८.११ **राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी) प्रमाणपत्र :** हवाईदल /नौदल /स्थल सेना विभागाचे सक्षम अधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र किंवा स्काऊट गाईड तालुका समादेशक /मुख्याध्यापक /प्राचार्य यांनी दिलेले प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र छात्र सेना (एम.सी.सी.) जिल्हा समादेशक अधिकारी /मुख्याध्यापक /प्राचार्य यांनी दिलेले प्रमाणपत्र. (सदरचे प्रमाणपत्र इ.८ वी ते १० वी या कालावधीतील असावे).

८.१२ **क्रिडा प्रमाणपत्र:** तालुका / जिल्हा क्रिडा अधिका-याने निर्गमित केलेले इयत्ता ८ वी ते १० वी या कालावधीतील प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येईल. केवळ मुख्याध्यापकाच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येणार नाही. नोंदनीकृत क्रिडा असोशियनने प्राधिकृत केलेल्या क्रिडा स्पर्धेच्या प्रमाणपत्रावर तालुका / जिल्हा क्रिडा अधिकारी यांची प्रतिस्वाक्षरी असल्यास अधिभार मिळेल.

८.१३ **तालुका / जिल्हा स्तरावर सांस्कृतीक नैपुण्य/वाद विवाद:** नाटक इत्यादी स्पर्धेमध्ये भाग घेतला असल्यास इयत्ता ८ वी ते १० वी या कालावधीतील यासंबधी शिक्षणाधिका-याचे प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येईल.

८.१४ स्वातंत्र्य सैनिकांसाठी असलेल्या आरक्षण सवलतीचा लाभ स्वातंत्र्य सैनिकांचे मुलगा / मुलगी किंवा मुलाची /मुलीची, मुलगा /मुलगी यांना खालील अटींच्या अधीन राहून दिला जाईल. अर्जदाराचे आई / वडील किंवा आजी /आजोबा स्वातंत्र्यसैनिक असल्याबाबतचे मा. मुख्यमंत्र्यांचे स्वाक्षरीचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. स्वातंत्र्य सैनिक यांचे खालील मुद्यांवरील रुपये १००/- चे स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.

- अर्जदार हा स्वातंत्र्यसैनिकाच्या मुलाचा /मुलीचा, मुलगा /मुलगी आहे.
- स्वातंत्र्यसैनिक ह्या सवलतीचा उपयोग यापूर्वी कुठल्याही नातेवाईकासाठी केलेला नाही.
- स्वातंत्र्यसैनिक ह्या सवलतीचा उपयोग कुठल्याही नातेवाईकासाठी, जर आता उपयोग केला तर पुढे करणार नाही.

८.१५ **आजी माजी सैनिक असल्याचे प्रमाणपत्र**: अर्जदाराचे वडील सैनिक असल्यास संबधीत सैन्याधिकारी / जिल्हा सैनिक बोर्डाचे अधिकारी यांचे विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र **किंवा** Discharge Certificate. अर्जदार स्वत: सैनिक असल्यास संबधित सैन्याधिकारी / जिल्हा सैनिक बोर्डाचे अधिकारी यांचे विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र किंवा Discharge Certificate (टिप: उमेदवार माजी सैनिक असल्यास त्याचे वय ४५ पेक्षा जास्त नसावे)

८.१६ **कृषि विद्यापीठे /कृषि परीषदेचे कर्मचारी असल्याचे प्रमाणपत्र:** अर्जदाराचे आई-वडील कृषि विद्यापीठे /कृषि परिषदेचे आजी /माजी अथवा मृत सेवक असल्यास कृषि परिषदेचे मा. प्रशासन अधिकारी व कृषि विद्यापीठाकरीता मा. कुलसचिव किंवा कार्यालय प्रमुख किंवा नियंत्रण अधिकारी यांचे प्रमाणपत्र जोडावे.

८.१७ **अपंग असल्याचे प्रमाणपत्र :** अपंग वर्गवारीसाठी अर्जदाराचे ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याबाबतचे जिल्हा शल्यचिकित्सक / वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र. स्वत:ची वैद्यकीय तपासणी केल्याबाबतचा नोंदणीकृत वैद्यकीय अधिका-याचा दाखला

८.१८ **अनाथ प्रमाणपत्र**: आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांच्या छापील लेटरहेड वरील उपायुक्त (बाल विकास), पुणे /आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र.

**उक्त अपलोड केलेल्या प्रतींच्या सत्यतेबाबत परीशिष्ट सी येथील नमुन्यात स्वघोषणापत्र संकेत स्थळावर अपलोड करावे.**

८.१९ स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड केलेले मुळ कागदपत्रे वाचणीय असावेत. याची खातरजमा करूनच कागदपत्रे अपलोड करावीत. अपलोड केलेली मुळ कागदपत्रे वाचनीय नसल्यास ते ग्राहय धरण्यात येणार नाहीत व त्याची जबाबदारी पुर्णत: अर्जदाराची असेल.

८.२० सर्व दृष्टिने परिपूर्ण भरलेला तसेच प्रवेश वेळापत्रकात दिलेल्या शेवटच्या तारखेचा संकेतस्थळावर भरलेला अर्ज प्रवेशासाठी ग्राहय धरला जाईल.

८.२१ खालील पैकी कोणत्याही एका त्रुटीमुळे प्रवेश अर्जाचा विचार न करता तो आपोआपच रदद समजण्यात येईल.

८.२१.१ अर्जदाराचे पासपोर्ट आकाराचे सद्याचे स्वत:चे छायाचित्र व स्वत:ची स्वाक्षरी संकेतस्थळावर अपलोड केली नसल्यास.

८.२१.२ पात्रता परीक्षेचे गुणपत्राची प्रत लिंक वर अपलोड केली नसल्यास.

८.२१.३ संकेतस्थळावर अपलोड केलेल्या पतींच्या सत्यतेबाबत स्वयंघोषणापत्र लिंक वर अपलोड केले नसल्यास.

८.२१.४ मुळ शाळा सोडल्याचा दाखला किंवा बोनाफाईड सर्टिफिकेट (Bonafied Certificate) ची प्रत लिंक वर अपलोड केली नसल्यास.

८.२१.५ नोकरी / सेवेत असणा-या अर्जदाराने संबधित नियुक्ती प्राधिका-याचे ना हरकत प्रमाणपत्र लिंक वर अपलोड केले नसल्यास.

८.२१.६ प्रवेश अर्जाचे विहीत शुल्क न भरल्यास सदर अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाही.

८.२१.७ कृषि तंत्र पदविका / कृषि तंत्र निकेतन अभ्यासक्रमाच्या प्रवेशाच्या वेळी किंवा गुणवत्ता यादी तयार करतांना दोन किंवा त्यापेक्षा उमेदवारांना सम समान गुण असतील तर अशा अर्जदारांचा गुणवत्ताक्रम ठरविण्यासाठी खालील कार्यपध्दतीचा अनुक्रमे अवलंब करण्यात येईल.
**अ)** कमी प्रयत्नात इयत्ता १० वी उत्तीर्ण झालेला अर्जदार
**ब)** वयाने मोठा असलेला अर्जदार

८.२१.८ प्रवेशावेळी लिंक वरील अर्जाची प्रत व सोबत ऑनलाईन स्कॅन केलेले सर्व मुळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे घेऊन ज्या त्या जिल्हयातील घटक / शासकीय / निमशासकीय कृषि तंत्र विद्यालये / निकेतने येथे उपस्थित रहाणे.

८.२१.९ जागेवर प्रवेशफेरी दरम्यान अर्जदाराने स्वत: हजर रहाणे बंधनकारक आहे.

८.२१.१० परिशिष्ट स्कॅन करुन लिंक वर अपलोड करणे.

## ९. प्रवेश कार्यपध्दती

९.१ प्राप्त झालेल्या प्रवेश अर्जावरुन ॲनालायटिका बिझिनेस सोल्युशन्स, पुणे ही संस्था / कंपनी कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रमासाठी जिल्हानिहाय आणि कृषि तंत्र निकेतन अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील दहा जिल्हयातील प्रवेश अर्ज भरलेल्या अर्जदाराची तात्पुरती गुणवत्ता यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करेल.

९.२ **हरकत निवारण समिती सदस्य**

| | |
|---|---|
| मा. सहयोगी अधिष्ठाता (कृतंशि), मफुकृवि, राहुरी | अध्यक्ष |
| कृषि विद्यापीठातील घटक कृषि तंत्र विद्यालयाचे दोन वरीष्ठ प्राचार्य | सदस्य |
| ॲनालायटिका बिझिनेस सोल्युशन्स, पुणे चे संपर्क अधिकारी / प्रतिनिधी | सदस्य |
| तांत्रिक अधिकारी (कृतंशि), मफुकृवि, राहुरी | सदस्य सचिव |

९.३ कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रमासाठी जिल्हानिहाय आणि कृषि तंत्र निकेतन अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील दहा जिल्यातील अर्जदाराची तात्पुरती गुणवत्ता यादी लिंक वर प्रसिध्द झाल्यानंतर हरकत निवारण कालावधी (Grievence Redressal Period) सुरू होईल. तो सुरू झाल्यानंतर अर्जदाराला लिंक वर Log in व्दारे अपूर्ण कागदपत्रांची माहिती कळू शकेल.

९.४ त्यानुसार तो/ती विद्यार्थी त्याच्या Log in मध्ये documents upload या बटनाव्दारे Grievence या Link व्दारे त्याची /तिची राहिलेली कागदपत्रांची पुर्तता documents upload करु शकतो. सदर कागदपत्रांची छाननी करून तो / ती योग्य असल्यास मान्य होतील /नसल्यास अमान्य होतील.

९.५ प्रवेश अर्ज सादर केल्यानंतर कोणतेही अतिरीक्त कागदपत्रे कृषि विद्यापीठ किंवा ॲनालायटिका बिझिनेस सोल्युशन्स, पुणे येथे स्वीकारली जाणार नाहीत.

९.६ या सर्व प्रक्रियेनंतर अंतिम गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात येईल.

९.७ अ. कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रमासाठी अर्जदाराचा प्रवेश हा रहिवाशी जिल्हयानुसार दिला जाईल. प्रवेश प्रक्रिया ही संबधित कृषि तंत्र विद्यालयांत उमेदवार ज्या जिल्हयाचा रहिवाशी आहे, तो त्या जिल्हयातील कृषि तंत्र विद्यालयात प्रवेशास पात्र राहील.

ब. कृषि तंत्र निकेतन अभ्यासक्रमासाठी अर्जदाराना प्रवेश हा विद्यापीठ कार्यक्षेत्रातील दहा जिल्हयातून दिला जाईल.

९.८ सक्षम प्राधिका-याचे अधिवास प्रमाणपत्र **किंवा** महाराष्ट्र राज्यातील जन्म ठिकाणचा उल्लेख असलेले महाविद्यालय/ शाळा सोडल्याचा दाखला किंवा महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्राधिका-याकडील जन्म दाखला यावरुन उमेदवाराचा रहिवाशी जिल्हा निश्‍चित केला जाईल.

९.९ ॲनालायटिका बिझिनेस सोल्युशन्स, पुणे तर्फे

**अ.** कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रमासाठी संबधीत कृषि तंत्र विद्यालयाच्या जिल्हानिहाय व विद्यालय निहाय गुणवत्ता याद्या लिंक वर प्रसिध्द करण्यात येतील.

**ब.** कृषि तंत्र निकेतन अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील दहा जिल्हयातील प्रवेश अर्ज भरलेल्या अर्जदारामधून कृषि तंत्र निकेतन निहाय गुणवत्ता यादी लिंक वर प्रसिध्द करणेत येईल.

९.१० प्रवेश वाटप यादी प्रसिध्द झाल्यानंतर ज्या अर्जदारास प्रवेशाचे वाटप झालेले आहे त्या विद्यार्थ्याने **mpkv.diplomaadmission.com** या लिंक व्दारे स्वत:च्या login ID आणि Password देवून तात्पुरते प्रवेश पत्र प्राप्त करुन घ्यावे.

९.११ अर्जदाराने प्राप्त केलेले तात्पुरते प्रवेशपत्र, विहीत प्रवेश शुल्क, मूळ प्रमाण/कागद पत्रे (छायांकीत प्रती दोन संच) व स्वत:चे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र इत्यादीसह प्रवेश पत्रात नमूद केलेल्या संबधित कृषि तंत्र विद्यालय / कृषि तंत्र निकेतन येथे स्वत: उपस्थित रहावे.

९.१२ कोणत्याही अर्जदाराची असा प्रवेश नाकरण्याची इच्छा असल्यास आणि पुढील प्रवेश फेरीसाठी त्याचा / तिचा विचार व्हावा, असे वाटत असल्यास, लॉग इनमध्ये डेबीट कार्ड / क्रेडीट कार्ड / नेट बँकींगव्दारे रु. १००/- ऑनलाईन अदा करून प्रवेश नाकारावा. अन्यथा पुढील प्रवेश फेरीसाठी विचार होणार नाही. तथापि, स्थळ प्रवेश (Spot Admission) फेरीसाठी पात्र राहील.

९.१३ प्रवेशीत अर्जदार पुढील प्रवेश फे-यांव्दारे प्रवेशास पात्र असणार नाही. मात्र प्रवेश वाटपानुसार प्रवेश घेतल्यानंतर प्रवेश प्रक्रियेच्या कालावधीमध्ये अर्जदाराने प्रवेश रदद केल्यास / पवेश वाटप नाकारल्यास असा अर्जदार प्रवेश रदद / नाकारलेला विकल्प वगळता पुढील ऑनलाईन प्रवेश फे-यांव्दारे इतर विकल्पांकरीता प्रवेशासाठी पात्र असेल प्रवेश नाकारण्यासाठी दिलेल्या कालावधीमध्ये प्रवेश रदद करता येईल.

९.१४ जिल्हयातील सर्व जागांचा तपशिल प्रवेश प्रक्रियेची फेरी संपल्यानंतर कृषि तंत्र विद्यालय यांचे प्राचार्य, विद्यापीठाच्या घटक कृषि तंत्र विद्यालयाच्या प्राचार्यांकडे प्रवेशाच्या संबधित कागदपत्रांसह सादर करतील. कृषि तंत्र विद्यालयाच्या व कृषि तंत्र निकेतनाच्या प्राचार्यांनी सर्व रिक्त जागांचा तपशिल त्यांच्या विद्यालय लॉग इनव्दारे संकेतस्थळावर अद्यावत करावा. (कार्यालयीन कामकाज)

९.१५ विनाअनुदानीत कृषि तंत्र निकेतन, येथील रिक्त जागांचा तपशिल प्रवेश प्रक्रियेची फेरी संपल्यानंतर ज्या त्या जिल्हयातील कृषि तंत्र निकेतने यांना त्या जिल्हयातील प्राचार्य घटक कृषि तंत्र विद्यालय, यांचेकडे प्रवेशाच्या संबधित कागदपत्रांसह सादर करतील. कृषि तंत्र निकेतन, काष्टी / व इतर विनाअनुदानीत प्राचार्यांनी सर्व रिक्त जागांचा तपशिल त्यांच्या निकेतन लॉग इन व्दारे लिंक वर अद्यावत करावे. (कार्यालयीन कामकाज)

९.१६ पहिल्या फेरी नंतर रिक्त राहिलेल्या जागांसाठी प्रवर्ग बदलून शासकीय नियमानुसार दुसरी फेरी राबविण्यात येईल.

९.१७ पहिल्या व दुस-या फेरीव्दारे दिलेल्या प्रवेशाची कार्यवाही संबधित कृषि तंत्र विद्यालयात /कृषि तंत्र निकेतनांत करण्यात येईल. तथापि, प्रवेशाची शेवटची फेरी/स्थळ प्रवेश (Spot Admission) फेरी ही घटक कृषि तंत्र विद्यालयांत /कृषि तंत्र निकेतन, काष्टी येथे प्रवेश कार्यक्रम पत्रिकेनुसार राबविली जाईल.

विनाअनुदानित कृषि तंत्र निकेतन, यांची प्रवेशाची शेवटची फेरी ही ज्या त्या जिल्हयातील घटक कृषि तंत्र विद्यालय, येथे कार्यक्रम पत्रिकेनुसार राबविली जाईल. या फेरीत कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रासाठी जिल्हा बंदीची अट शिथील करून तसेच, कृषि तंत्र निकेतन अभ्यासक्रमासाठी या फेरीत **mpkv.diplomaadmission.com** लिंक व्दारे प्राप्त झालेल्या यादीनुसार उपस्थितामधून गुणानुक्रमे (Spot Admission) प्रवेश दिला जाईल.

९.१८ एखाद्या अर्जदाराला प्रवेश वाटपाबाबत तक्रार करावयाची असल्यास, संबधित प्रवेश वाटप फेरीच्या कालावधीतच कृषि विद्यापीठाचे मा.कुलसचिव, यांच्याकडे उमेदवार तक्रार अर्ज दाखल करू शकेल. अशा तक्रारीबाबत तात्काळ शहानिशा करून यथायोग्य कार्यवाही करण्यास मा.कुलसचिव, मफुकृवि, राहुरी हे सक्षम असतील.

**१०. कृषि तंत्र पदविका / कृषि निकेतन पदविका प्रवेश प्रक्रिया कार्यक्रम पत्रिका: २०२५-२६**

| अ.क्र | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची सुरुवात | २८.०५.२०२५ |
| २ | ऑनलाईन प्रवेश अर्ज व त्यासोबतची आवश्यक ती स्कॅन केलेली प्रमाणपत्रे / कागदपत्रे लिंक वर अपलोड करावयाचा अंतिम दिनांक | **१५.०६.२०२५** |
| ३ | अंतरिम (तात्पुरती) गुणवत्ता यादीची प्रसिध्दी | १६.०६.२०२५ (सायं. ०५.३० नंतर) |
| ४ | ऑनलाईन तक्रार नोंदणीचा कालावधी | १७.०६.२०२५ ते १९.०६.२०२५ |
| ५ | विचारात घेण्यात आलेल्या तक्रारीच्या यादीची प्रसिध्दी | २०.०६.२०२५ (सायं. ०५.३० नंतर) |
| ६ | अंतिम गुणवत्ता यादीची प्रसिध्दी | २१.०६.२०२५ |
| ७ | १. जिल्हा निहाय पहिल्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी | २२.०६.२०२५ (सायं. ०५.३० नंतर) |
| | २. संबधित विद्यालयात उपस्थित राहुन प्रवेश घेण्याचा कालावधी | २३.०६.२०२५ ते २४.०६.२०२५ |
| ८ | १. रुपांतरासह दुसऱ्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी | २५.०६.२०२५ |
| | २. संबधित विद्यालयात उपस्थित राहुन प्रवेश घेण्याचा कालावधी | २६.०६.२०२५ ते २७.०६.२०२५ |
| ९ | गुणवत्ता यादीनुसार घटक विद्यालय स्थरावर /विद्यापीठ स्थरावर भरावयाच्या रिक्त जागांच्या तपशीलाची लिंक वर प्रसिध्दी | ३०.०६.२०२५ (सायं. ०५.३० नंतर) |
| १० | रिक्त जागेंकरीता 'जागेवर प्रवेश फेरी ' (Spot Round) | ०१.०७.२०२५ ते ०३.०७.२०२५ |
| ११ | वर्ग सुरु होण्याचा दिनांक | ०७.०७.२०२५ |

(रिक्त जागांच्या अहवालानुसार अतिरिक्त प्रवेश फेऱ्या संभाव्य असतील).

**११. प्रवेश रद्द केल्यानंतर शुल्क परतावा**

- प्रवेशाची नोंदणी केल्यानंतर व वर्ग सुरू झाल्यानंतर अर्जदाराने प्रवेश रदद केल्यास अर्जदाराकडून प्रवेश शुल्कापोटी कमाल रु. १०००/- रक्कम कपात करण्यात येईल.
- प्रवेशाची नोंदणी केल्यानंतर व वर्ग सुरू झाल्यानंतर अर्जदाराने प्रवेश रदद केल्यास वर्ग सुरू झालेल्या महिन्यापासून ज्या महिन्यामध्ये प्रवेश रदद केला असेल, त्या महिन्यापर्यंत दरमहा होणारे होणारे वर्ष / सत्र आधारीत शिक्षण शुल्क व दरमहा होणारे वसतीगृह शुल्क (वसतीगृह उपलब्ध करून दिलेले असल्यास ) संबधित विद्यार्थ्याकडून वसूल करण्यात येईल.
- वर्ग सुरू झाल्यानंतर राबविण्यात आलेल्या प्रवेश फेरीव्दारे प्रवेश मिळालेल्या अर्जदारानी नोंदणी करून प्रवेश रदद केल्यास, नोंदणी केलेल्या तारखेच्या महिन्यापासून ज्या महिन्यामध्ये प्रवेश रदद केला असेल त्या महिन्यापर्यंत दरमहा होणारे वर्ष / सत्र आधारीत शिक्षण शुल्क व दरमहा होणारे वसतीगृह शुल्क (वसतीगृह उपलब्ध करून दिलेले असल्यास) संबधित अर्जदाराकडून वसूल करण्यात येईल.

**१२. विद्यार्थ्यांची वर्तणूक व शिस्त**

कोणत्याही प्रकारची बेशिस्त किंवा गैरवर्तणूक ही रॅगिंग विरोधी कायदा, १९९९ च्या तरतुदीनुसार शिक्षापात्र गुन्हा ठरते. विद्यार्थी रॅगिंग, अपहरण, आणि विद्यालयीन इतर गैरशिस्तीच्या प्रकरणात आढळून आल्यास त्यास / पालकांस पूर्वसूचना न देता विद्यालयातून काढून टाकण्यात येईल. तसेच, रॅगिंगच्या नियमानुसार त्याचेवर कार्यवाही होईल. त्यासाठी विद्यार्थ्यांनी / पालकांनी helplilne@antiragging.in साईटवर भेट देऊन रॅगिंगबाबतची संपूर्ण माहिती स्वत: अवगत करुन घ्यावी. प्रत्येक विद्यालयाच्या प्राचार्यांनी प्रत्येक विद्यार्थ्याचे व त्याच्या पालकाचे त्याचा प्रवेश निश्चित झाल्यानंतर रॅगिंगबाबतचे प्रतिज्ञापत्र ऑनलाईन पध्दतीचे www.antiragging.in किंवा www.amanmovement.org या संकेतस्थळावर भरुन घेणे सक्तीचे आहे. **विद्यालयाच्या आवारात कोणत्याही प्रकारचे वाद्य वाजविण्यास सक्त मनाई असेल**. तसेच शासकीय/ निमशासकीय विद्यालयांच्या वस्तीगृहातील विद्युत, फर्निचर वा इतर कार्यालयीन साधने यांचा विद्यार्थ्यांनी काळजीपुर्वक वापर न केल्यास दंडात्मक कारवाही करण्यात येईल.

**१३. शिष्यवृत्ती आणि सवलती**

कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम व्यावसायीक म्हणून घोषित झालेले नाहीत. त्यामुळे व्यावसायीक अभ्यासक्रमांना लागू असलेल्या शैक्षणिक सवलती (शैक्षणिक शुल्क परीपूर्ती व शिष्यवृत्ती) सदर अभ्यासक्रमांना अनुज्ञेय / देय नाहीत.

**तथापि, अव्यावसायिक अभ्यासक्रमांना लागू असलेल्या शैक्षणिक सवलती व शासनमान्य भारत सरकार शिष्यवृत्ती लागू असल्यास तिचा लाभ विद्यार्थ्यांना मिळू शकेल. परंतु, त्यासाठी विहित कालावधीत भा.स.शि. आवेदन पत्र संबधित विभागाच्या संकेत स्थळावर करणे ही विद्यार्थ्यांची जबाबदारी राहील.**

**१४. आरक्षित जागा**

महाराष्ट्र कृषि विद्यापीठे अधिनियम १९८३ मधील तरतुदीनुसार या विद्यापीठातर्गत विद्यालयांमध्ये प्रवेशासाठी खालील प्रमाणे जागा आरक्षित ठेवण्यात आलेल्या आहेत.

| **अ.क्र.** | **वर्ग** | **आरक्षित जागांची टक्केवारी** |
|---|---|---|
| १ | अनुसुचित जाती व नवबौध्द | १३ |
| २ | अनुसुचित जमाती | ७ |
| ३ | अ) विमुक्त जाती (अ) (व्ही.जे.अे. / डी.टी.अे.) (१४ व तत्सम जाती) | ३ |
| | ब) भटक्या जमाती (ब) (जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जाती) (एन.टी.ब) | २.५ |
| | क) भटक्या जमाती (क) (एन.टी-सी) (धनगर व तत्सम जमाती) | ३.५ |
| | ड) भटक्या जमाती (ड) (एन.टी-डी) ( वंजारी व तत्सम जाती) | २.० |
| ४ | इतर मागास वर्ग (OBC) | १९ |
| ५ | अर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS) | १० |
| ६ | सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (SEBC) वर्गातील घटकांसाठी * | १० |
| | **एकूण** | **७०** |
| ७ | शेतक-यांचे मुले (अे.जी) | ६ |
| ८ | स्वातंत्र्य सैनिकांची मुले (एफ.एफ) | २ |
| ९ | महाराष्ट्र शासनाच्या प्रकल्प विस्थापीत पुनर्वसन अधिनियम १९९६ नुसार प्रकल्प विस्थापीत व्यक्ती आणि त्याची मुले (पी.ए.पी) | ४ |
| १० | आजी व माजी सैनिकांची मुले (डी.पी) | २ |
| ११ | अपंग (४० टक्के किंवा त्या पेक्षा जास्त अपंगत्व असल्याचे जिल्हा शल्यचिकित्सालयाचे प्रमाणपत्र आवश्यक) (पी.एच) | ३ |
| १२ | महिला | ३० |
| १३ | अनाथ | १ |

* वरील आरक्षणामध्ये प्रवेश प्रक्रियेच्या वेळेस प्रचलित शासन निर्णयानुसार बदल संभवतो.

**१४.१** अनुक्रमांक ७ ते १२ या आरक्षणाचा खुला व आरक्षित संवर्गामध्ये समावेश करण्यात आलेला आहे, तसेच क्र. १३ हे आरक्षण खुल्या प्रवर्गात गुणवत्तेनुसार समाविष्ट राहील.

**१४.२** भारतीय संविधानानुसार मंडल आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवा योजना विभाग क्र. टीइएम १०२४/ (६३०३)/ताशि-१ दिनांक ३ जून, १९९४ मधील परिच्छेद क्र. ४ मध्ये विहीत केल्याप्रमाणे एकूण ५० टक्के जागा आरक्षित करण्यात येतील.

**१४.३** पदवी, पदव्युत्तर आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रकियेसंदर्भात शासन निर्णय क्र. कृषि व पदुम विभाग, क्र. मकृवि २०१०/प्र.क्र.१५५/७ अे, दि.२०.१०.२०११ मध्ये नमूद करण्यात आलेल्या जागांच्या रुपांतराच्या कार्यपध्दतीच्या धर्तीवर पदविका अभ्यासक्रमाच्या रिक्त जागांचे रुपांतर करण्यात येईल.

**१४.४** शासन निर्णय क्रमांक सीबीसी १०/२३००६/प्र.क्र.१५/मावक ५, दिनांक ५.६.२००६ अन्वये विमुक्त जाती अ, ब भटक्या जमाती क, ड त्याचबरोबर इतर मागासवर्गीय आणि विशेष मागास प्रवर्ग यांनी उपविभागीय अधिकारी यांच्या स्वाक्षरी व शिक्या निशी क्रिमिलिअर लागू नसल्याचे प्रमाणपत्र सादर करावे. अन्यथा, सदर उमेदवारास त्या प्रवर्गाचे आरक्षण मिळणार नाही. म्हणजेचे तो उमेदवार खुल्या प्रवर्गाचा धरला जाईल.

**१४.५** इतर आरक्षणांतर्गत अ.क्र. १२ येथील महिलांच्या विशेष आरक्षणास त्या त्या प्रवर्गासाठी विहीत करण्यात आलेल्या टक्केवारीनुसार वाटा निश्चीतपणे मिळावा यासाठी सामान्य प्रशासन विभाग परीपत्रक क्र. एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१९८/१६/अ, दिनांक १६.३.१९९९ मध्ये नमूद केलेली कार्यपध्दती अनुसरण्यात येईल.

**१५. गुणाधिभार**

| **अ.क्र.** | **बाब** | **गुण टक्केवारी** |
|---|---|---|
| १ | तलाठी / पटवारी यांनी सन २०२५-२०२६ मध्ये दिलेला शेत जमीनीचा ८अ/७/१२ चा उतारा/खसरा (गाव नमूना) उमेदवाराच्या नावावर किंवा त्याचे आई / वडील किंवा त्याचे आजी /आजोबा यांच्या नांवे, यदाकदाचित आई वडील हयात नसतील, तर सदर उतारा त्याच्या कुटुंब प्रमुखाच्या नावावर असावा. | १२ |
| २ | एन.सी.सी/एम.सी.सी / स्काऊट गाईड प्रमाणपत्र असल्यास (तालुका / जिल्हा समादेशक / मुख्याध्यापक यांचे प्रमाणपत्र ग्राहय धरले जाईल) (इयत्ता ८ वी ते १० वी पर्यंतचे ) | २ |
| ३ | क्रिडा / सांस्कृतिक नैपुण्य / वादविवाद / नाटक इत्यादी स्पर्धेमध्ये भाग घेतला असल्यास तालुका जिल्हा स्तरावरील सहभाग (इयत्ता ८ वी ते १० वी पर्यंतचे) | २ |
| ४ | राज्यातील उमेदवाराचे पालक कृषि परीषदेचे आजी / माजी अथवा मृत सेवक असल्यास कृषि परिषदेचे मा. प्रशासन अधिकारी व कृषि विद्यापीठाकरीता मा. कुलसचिव किंवा कार्यालय प्रमुख /संबधित कार्यालय प्रमुख / नियंत्रण अधिका-याचे प्रमाणपत्र | ३ |
| | **एकूण अधिभार** | **१९** |

**१६. अभ्यासक्रमाचे शुल्क**

**२३. कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम (२ वर्ष - मराठी माध्यम) कृषि तंत्रनिकेतन अभ्यासक्रम (३ वर्ष - इंग्रजी माध्यम )**

निवड झालेल्या उमेदवारांना प्रवेश घेतेवेळी संबधित शासकीय / अनुदानीत अथवा विनाअनुदानीत विद्यालयांमध्ये शुल्क भरावे लागेल. अभ्यासक्रमाकरीता निर्धारीत केलेल्या शुल्काचा तपशिल खालील प्रमाणे.

**१६.१ कृषि तंत्र पदविका (२ वर्ष - मराठी माध्यम)**

| अ.न. | सर्वसाधारण शुल्क | शासकीय / अनुदानित | | विना अनुदानित | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष | प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष |
| **(अ) शुल्क (रुपये)** | | | | | |
| १ | शिक्षण शुल्क | २०,००० | २०,००० | ३०,००० | ३०,००० |
| २ | प्रवेश शुल्क | १,००० | १,००० | १,००० | १,००० |
| ३ | नोंदणी शुल्क | ५०० | ५०० | ५०० | ५०० |
| ४ | वाचनालय शुल्क | १०० | १०० | १०० | १०० |
| ५ | परीक्षा शुल्क | १,२०० | १,२०० | १,२०० | १,२०० |
| ६ | अनामत शुल्क * | १०० | -- | १०० | -- |
| ७ | सत्र शुल्क | १०० | २०० | १०० | २०० |
| ८ | ओळखपत्र शुल्क | १०० | -- | १०० | -- |
| ९ | वैद्यकीय शुल्क | ५० | ५० | ५० | ५० |
| १० | विद्यार्थी विमा हप्ता | १०० | १०० | १०० | १०० |
| ११ | जिमखाना शुल्क | १५० | १५० | १५० | १५० |
| | **एकूणशुल्क (रुपये) (अ)** | **२३,४००** | **२३,३००** | **३३,४००** | **३३,३००** |
| **(ब) वसतीगृहात राहू इच्छिणा-या विद्यार्थ्यांसाठी** | | | | | |
| १ | वसतीगृह शुल्क | १,००० | १,००० | १,००० | १,००० |
| २ | भांडी शुल्क | १०० | १०० | १०० | १०० |
| ३ | मेस (खानावळ) डिपॉझीट ** | १,००० | -- | १,००० | -- |
| ४ | विद्युत बील आकार | १,००० | १,००० | १,००० | १,००० |
| | **एकूण शुल्क (रुपये) (ब)** | **३,१००** | **२,१००** | **३,१००** | **२,१००** |
| | **एकूण शुल्क (रुपये) (अ) + (ब)** | **२६,५००** | **२५,४००** | **३५,५००** | **३५,४००** |

*
** सेवा उपलब्ध असल्यास विद्यार्थ्यांना परत करावयाची रक्कम

## १६.२ शासकीय तथा विद्यापीठ अनुदानीत कृषि तंत्र निकेतन (३ वर्ष - पूर्ण इंग्रजी माध्यम - सहा सत्र)

| अ.न. | सर्वसाधारण शुल्क | शासकीय तथा विद्यापीठ अनुदानित | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पहिले सत्र | दुसरे सत्र | तिसरे सत्र | चौथे सत्र | पाचवे सत्र | सहावे सत्र |
| (अ) शुल्क (रुपये) | | | | | | | |
| १ | शिक्षण शुल्क | ८००० | ८००० | ८००० | ८००० | ८००० | ८००० |
| २ | प्रवेश शुल्क | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० |
| ३ | नोंदणी शुल्क | २०० | २०० | २०० | २०० | २०० | २०० |
| ४ | वाचनालय शुल्क | ३०० | ३०० | ३०० | ३०० | ३०० | ३०० |
| ५ | परीक्षा शुल्क (प्रती विद्यार्थी) | ८०० | ८०० | ८०० | ८०० | ८०० | ८०० |
| ६ | गुणपत्रक (ग्रेड कार्ड)शुल्क | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० |
| ७ | पदविका प्रमाणपत्र शुल्क | ००० | ००० | ००० | ००० | ००० | ५०० |
| ८ | विद्यार्थी सहाय्यक कल्याण निधी | १५० | ००० | १५० | ००० | १५० | ००० |
| ९ | जिमखाना शुल्क | ३५० | ३५० | ३५० | ३५० | ३५० | ३५० |
| १० | युवक महोत्सव शुल्क | १०० | ००० | १०० | ००० | १०० | ००० |
| ११ | निकेतन मासिक (मॅगेझीन) शुल्क | १५० | ००० | १५० | ००० | १५० | ०५० |
| १२ | क्रिडा स्पर्धा | १० | ०० | १० | ०० | १० | ००० |
| १३ | आपत्ती व्यवस्थापन शुल्क | १० | ०० | १० | ०० | १० | ००० |
| १४ | ओळखपत्र शुल्क | ११० | ००० | ००० | ००० | ००० | ००० |
| १५ | वैद्यकीय शुल्क | १०० | ००० | १०० | ००० | १०० | ००० |
| १६ | विद्यार्थी सुरक्षा विमा हप्ता | १५० | ००० | १५० | ००० | १५० | ००० |
| १७ | अनामत शुल्क ** | १००० | ०००० | ००० | ०००० | ००० | ००० |
| १८ | को- ऑपरेटीव्ह सोसायटी * | १०० | ००० | १०० | ००० | १०० | ००० |
| १९ | वार्षिक पारीतोषिक वितरण समारंभ | १०० | ००० | १०० | ००० | १०० | ००० |
| २० | इलिजिबिलिटी शुल्क | ३०० | ००० | ३०० | ००० | ३०० | ००० |
| | **एकूण (अ)** | **१२११३०** | **९८५०** | **११०२०** | **९८५०** | **११०२०** | **१०४००** |
| (ब) वसतीगृहात राहू इच्छिणा-या विद्यार्थ्यांसाठी | | | | | | | |
| १ | वसतीगृह अनामत शुल्क ** | २००० | ०००० | ०००० | ०००० | ०००० | ०००० |
| २ | वसतीगृह शुल्क * | २५०० | २५०० | २५०० | २५०० | २५०० | २५०० |
| ३ | विद्युत बिल आकार | २५०० | २५०० | २५०० | २५०० | २५०० | २५०० |
| ४ | मेस (खानावळ) डिपॉझीट ** | २००० | ०००० | ०००० | ०००० | ०००० | ०००० |
| | **एकूण (ब)** | **९०००** | **५०००** | **५०००** | **५०००** | **५०००** | **५०००** |
| | **एकूण (अ) + (ब)** | **२१११३०** | **१४८५०** | **१६०२०** | **१४८५०** | **१६०२०** | **१५४००** |

* सेवा उपलब्ध असल्यास

**विद्यार्थ्यांना परत करावयाची रक्कम

## १६.३ कायम विनाअनुदानीत खासगी कृषि तंत्र निकेतन (३ वर्ष - सहा सत्र - पूर्ण इंग्रजी माध्यम)

| अ.न. | सर्वसाधारण शुल्क | कायम विनाअनुदानित | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पहिले सत्र | दुसरे सत्र | तिसरे सत्र | चौथे सत्र | पाचवे सत्र | सहाव सत्र |
| (अ) शुल्क (रुपये) | | | | | | | |
| १ | शिक्षण शुल्क | १५००० | १५००० | १५००० | १५००० | १५००० | १५००० |
| २ | प्रवेश शुल्क | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० |
| ३ | नोंदणी शुल्क | २०० | २०० | २०० | २०० | २०० | २०० |
| ४ | वाचनालय शुल्क | ३०० | ३०० | ३०० | ३०० | ३०० | ३०० |
| ५ | परीक्षा शुल्क (प्रती विद्यार्थी) | ८०० | ८०० | ८०० | ८०० | ८०० | ८०० |
| ६ | गुणपत्रक (ग्रेड कार्ड) शुल्क | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० |
| ७ | पदविका प्रमाणपत्र शुल्क | ००० | ००० | ००० | ००० | ००० | ५०० |
| ८ | विद्यार्थी सहाय्यक कल्याण निधी | १५० | ००० | १५० | ००० | १५० | ००० |
| ९ | जिमखाना शुल्क | ३५० | ३५० | ३५० | ३५० | ३५० | ३५० |
| १० | युवक महोत्सव शुल्क | १०० | ००० | १०० | ००० | १०० | ००० |
| ११ | निकेतन मासीक (मॅगेझीन) | १५० | ००० | १५० | ००० | १५० | ०५० |
| १२ | क्रिडा स्पर्धा | १० | ०० | १० | ०० | १० | ००० |
| १३ | आपत्ती व्यवस्थापन शुल्क | १० | ०० | १० | ०० | १० | ००० |
| १४ | ओळखपत्र शुल्क | ११० | ००० | ००० | ००० | ००० | ००० |
| १५ | वैद्यकीय शुल्क | १०० | ००० | १०० | ००० | १०० | ००० |
| १६ | विद्यार्थी सुरक्षा विमा हप्ता | १५० | ००० | १५० | ००० | १५० | ००० |
| १७ | अनामत शुल्क ** | १००० | ०००० | ००० | ०००० | ००० | ००० |
| १८ | को- ऑपरेटीव्ह सोसायटी * | १०० | ००० | १०० | ००० | १०० | ००० |
| १९ | वार्षिक पारीतोषिक वितरण | १०० | ००० | १०० | ००० | १०० | ००० |
| २० | इलिजिबिलिटी शुल्क | ३०० | ००० | ३०० | ००० | ३०० | ००० |
| | **एकूण (अ)** | **१९१३०** | **१६८५०** | **१८०२०** | **१६८५०** | **१८०२०** | **१७४००** |

**विनाअनुदानीत कृषि तंत्र निकेतन यांचे वसतीगृह शुल्क हे मुददा क्रमांक १६.२ येथे नमूद केलेल्या शासकीय कृषि तंत्र निकेतन वसतीगृहाच्या शुल्काप्रमाणेच राहील. सदर शुल्क हे वरील अ.नं. १ ते २० शुल्काव्यतिरीक्त असेल.**

**टिप:**

१. वसतीगृह, खानावळ अनामत, विद्युत आकार हे शुल्क प्रवेशाच्या वेळी घेण्यात येऊ नयेत. प्रवेश नियमित झाल्यानंतर उपरोक्त सेवा उपलब्ध असल्यास या बाबतचे शुल्क आकारण्यात यावे. सेवा उपलब्ध नसल्यास शुल्क आकारु नये.

२. अनामत शुल्क, खानावळ अनामत इ. रक्कमा शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर लगेच विद्यार्थ्यांना परत करण्यात याव्यात.

३. विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास संबधित विषयाकरीता संपूर्ण वार्षिक परीक्षा शुल्क न आकारता संबधित विषयापुरतेच परीक्षा शुल्क आकारण्यात येईल

४. कृषि तंत्र पदविका / तंत्र निकेतन अभ्यासक्रम अथवा प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यास त्याचा व्यक्तीगत हिशोब तपासून प्रवेशाच्या वेळी त्याने भरलेली अनामत (Caution money) रक्कम विद्यार्थ्यांना गुणपत्रक देते वेळी परत केली जाईल.

५. **विनाअनुदानीत कृषि तंत्र निकेतनाकरीता व्यवस्थापन कोटा ऐच्छिक असेल तथापि, सदरहू व्यवस्थापन कोटयासाठी विद्यापीठाची मान्यता घेणे आवश्यक आहे. सदरहू व्यवस्थापन कोटयासाठी पहिले व दुसरे सत्र असे मिळून वार्षिक शुल्क रुपये ९०,०००/- इतके राहील.**

## १७. प्रवेशाकरीता तपासवयाच्या कागदपत्रांची सूची (Check List)

| अ.क्र. | प्रमाणपत्र / कागदपत्रांचा तपशील | आहे/नाही |
|---|---|---|
| १ | सक्षम प्राधिका-याचे अधिवास प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्यातील जन्म ठिकाणचा उल्लेख असलेले महाविद्यालय / शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्राधिका-याकडील जन्म दाखला / जिल्हा निश्चितीकरीता रहिवाशी प्रमाणपत्र | |
| २ | माध्यमिक / उच्च माध्यमिक शालांन्त (इयत्ता १० वी / १२ वी / कृषि तंत्र पदविका) गुणपत्रक व प्रमाणपत्र | |
| ३ | ज्या विद्यालयातून शेवटची परीक्षा उत्तीर्ण आहे, त्या विद्यालयाचा शाळा सोडल्याचा दाखला किंवा उमेदवाराने इतर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला असेल तर त्या विद्यालयाचे / महाविद्यालयाचे बोनाफाईड सर्टिफिकेट (Bonafide Certificate) | |
| ४ | राज्यातील पदनिर्देशीत सक्षम प्राधिका-याने दिलेले जात प्रमाणपत्र | |
| ५ | तहसीलदार, तालुका दंडाधिकारी अथवा विशेष कार्यकारी दंडाधिकारी यापेक्षा कमी दर्जा नसलेल्या सक्षम अधिका-यांनी दिनांक ०१.०४.२०२५ रोजी किंवा त्यानंतर दिलेले किंवा ज्या दिनांकास प्रवेश अर्ज दिला असेल त्या दिनांकास ग्राहय असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमिलीअर) प्रमाणपत्र | |
| ६ | उमेदवाराचे आई / वडील अथवा आजी / आजोबा स्वातंत्र्य सैनिक असल्याबाबतचे मा. पंतप्रधान / मा. मुख्यमंत्री यांची स्वाक्षरी असलेले प्रमाणपत्र | |
| ७ | स्वातंत्र्य सैनिक यांचे खालील प्रमाणे रुपये १००/- चे स्टँपपेपर वरील प्रतिज्ञापत्र<br>उमेदवार हा स्वातंत्र्यसैनिकाच्या मुलाचा / मुलीचा,मुलगा/मुलगी आहे.<br>स्वातंत्र्यसैनिकाने हया सवलतीचा उपयोग यापूर्वी कुठल्याही नातेवाईकासाठी केलेला नाही.<br>स्वातंत्र्य सैनिकाने हया सवलतीचा आता उपयोग केला तर पुढे करणार नाही. | |
| ८ | उमेदवाराचे वडील अथवा उमेदवार स्वत: सैनिक असल्यास संबधित सैन्याधिकारी / जिल्हाबोर्डाचे अधिकारी यांचे विहीत नमून्यातील प्रमाणपत्र किंवा Discharge Certificate ची प्रत | |
| ९ | दिव्यांग प्रवर्गासाठी उमेदवाराचे ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याबाबतचे जिल्हा शल्यचिकित्सक / वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र | |
| १० | महाराष्ट्रातील जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी उमेदवार / वडील हे प्रकल्पग्रस्त आहेत व त्याचे / तिचे वडीलांची /पालकांची किंवा आजोबांची शेतजमीन महाराष्ट्रातील कृषि विद्यापीठे / पाटबंधारे / वीज/ संरक्षण प्रकल्प या विभागासाठी संपादीत केलेली / झालेली आहे, असे प्रमाणपत्र सक्षम अधिका-याने दिलेल्या प्रकल्पग्रस्तांच्या प्रमाणपत्रावर या सवलतीचा फायदा ज्यांना घ्यायचा आहे त्यांच्या नांवाचा उल्लेख असणे आवश्यक आहे. | |
| ११ | अर्जदार किंवा त्याचे माता / पिता किंवा आजी / आजोबा (पित्याकडून) शेतजमीनीचे मालक किंवा कूळ म्हणून शेतजमीन धारक आहे/आहेत आणि त्यांचे उत्पन्नाचे मुख्य साधन जमिनीच्या वैयक्तीक मशागतीतून आहे हे दर्शविणारे तहसीलदार / नायब तहसीलदारापेक्षा कनिष्ठ दर्जा नसलेल्या अधिका-याचे विहीत नमुन्यातील / तहसीलदार किंवा नायब तहसीलदार यांनी दिलेल्या त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या विहीत नमून्यामध्ये सन २०२४-२०२५ या वर्षातील **शेतकरी असल्याबाबतचे प्रमाणपत्र (ऐजी)** | |
| १२ | (i) अर्जदाराचे नांवे किंवा माता / पिता / आजोबा - आजीच्या नांवे शेतजमीन आहे, हे दर्शविणारा तलाठी / पटवारी याने दिलेला **सन २०२५ या वर्षाचा गाव ८/अ/७/१२ उतारा**<br>(ii) आई / वडील हयात नसल्यास त्याच्या कुटुंब प्रमुखाच्या नावावरील ८/अ/७/१२ उतारा व कुटुंब प्रमुखाचे **रु. १००/- च्या मुद्रांकावर प्रतिज्ञापत्र.**<br>(iii) अर्जदाराच्या आईच्या वडीलोपार्जित शेतजमीनीमध्ये तिचा **हिस्सा असेल तर आईच्या पित्याचे रु. १००/- च्या मुद्रांकावर केलेले प्रतिज्ञापत्र.** | |

| अ.क्र. | प्रमाणपत्र / कागदपत्रांचा तपशील | आहे/नाही |
|---|---|---|
| १३ | अर्जदाराच्या माता / पित्याचे उपजिवीकेचे मुख्य साधन शेतजमीनीवरील शारीरिक श्रमाचे आहे, असा उल्लेख असणारे तहसीलदार / नायब तहसीलदाराचे **भूमिहिन शेतमजुराचे प्रमाणपत्र** (असे प्रमाणपत्र अर्जदाराचे नांव नसावे) तथापि, **अशा अर्जदारास शेतकरी (ऐजी) प्रवर्ग लागू असणार नाही.** | |
| १४ | राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी) प्रमाणपत्र, हवाईदल/नौदल/स्थलसेना विभागाचे सक्षम अधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र किंवा स्काऊट गाईड तालुका समादेशक /मुख्याध्यापक/ प्राचार्य यांनी दिलेले प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र छात्र सेना (एन.सी.सी) जिल्हा समादेशक अधिकारी / मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी दिलेले प्रमाणपत्र | |
| १५ | तालुका किंवा जिल्हा पातळीवर तालुका / जिल्हा क्रीडा अधिका-याने निर्गमित केलेले इयत्ता १० वी पर्यंतचे प्रमाणपत्र, नोंदणीकृत क्रीडा असोसीएशनचे प्राधिकृत केलेल्या क्रीडा स्पर्धेचे तालुका / जिल्हा क्रीडा अधिकारी यांची प्रति स्वाक्षरी असलेले प्रमाणपत्र | |
| १६ | राज्यातील उमेदवाराचे पालक कृषि परीषदेचे आजी / माजी अथवा मृत सेवक असल्यास कृषि परिषदेचे मा. प्रशासन अधिकारी व कृषि विद्यापीठाकरीता मा. कुलसचिव किंवा कार्यालय प्रमुख /संबधित कार्यालय प्रमुख / नियंत्रण अधिका-याचे प्रमाणपत्र जोडावे. | |
| १७ | सांस्कृतिक नैपुण्य / वादविवाद/नाटक इत्यादी स्पर्धेमध्ये भाग घेतला असल्यास तालुका / जिल्हा स्तरावरील सहभाग (इयत्ता ८ वी ते १० पर्यंतचे) प्रमाणपत्र | |
| १८ | सेवेत असलेले उमेदवार असल्यास संबधित कार्यालय प्रमुखाचे ना हरकत प्रमाणपत्र (No Objection Certificate). | |
| १९ | महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र.अमुजा२०११/प्र.क२१२/का- ३, दिनांक २.४.२०१८ अन्वये आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांच्या छापील लेटर हेडवरील उपायुक्त (बालविकास), पुणे / आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांच्या स्वाक्षरीचे अनाथ प्रमाणपत्र | |

**स्वाक्षरीत**
**(राजेंद्रकुमार पाटील)**
**कुलसचिव,**
**मफुकृवि, राहुरी**

परिशिष्ट ' सी '

अर्जदाराचा स्वत:चा<br>अलीकडील रंगीत<br>छायाचित्र / फोटो<br>३.५x३.५ सेमी

**सत्य प्रतींविषयी स्वयं घोषणापत्र**

मी, कुमार /कुमारी ------------------------------------------------------------- श्री / श्रीमती ----------------------यांचा मुलगा /मुलगी वय ------ वर्ष, आधार क्रमांक ------------------------- राहणार ---------------------------तालुका----------जि.---------------याव्दारे घोषित करतो/करते की, मी प्रवेश अर्जासोबत सादर केलेल्या प्रमाणपत्रे / कागदपत्रांच्या प्रतीं सत्य आहेत. अर्जासोबत सादर करण्यात आलेल्या प्रतीं यांची पडताळणी केली असता त्या खोट्या अथवा त्यांच्यात तफावत आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता आणि /किंवा संबधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पुर्ण जाणीवआहे.

**ठिकाण :** **अर्जदाराची स्वाक्षरी :**-----------------------

**दिनांक :**

**अर्जदाराचे नाव :**----------------------

## परिशिष्ट ' अ '

## भूमीहीन शेतमजूर असल्याचे प्रमाणपत्र (नमूना)

**(नायब तहसीलदार अथवा तहसीलदार यांचे स्वाक्षरीचे)**

श्री /श्रीमती ------------------------------------------------------------------------------------ राहणार ------------------------ तालुका ----------------जिल्हा ----------------- भूमीहीन असून त्यांच्या कुटुंबाचा चरितार्थ शेत मजूरीवर चालतो. त्यांनी -------------------------- या साली श्री /श्रीमती ------------ ---------------------------------------------------------------------- (जमीनधारकाचे नाव) मौजे ------------ तालुका --------------------- जिल्हा ---------------------- यांच्या शेतावर शेतमजूर म्हणून काम केले आहे.

खाली नमूद केलेला पुरावा तपासल्यानंतर श्री /श्रीमती/कुमार ---------------------------------------- ----------------------------------------- (अर्जदाराचे नाव) हे वरील शेतमजूराचा मुलगा /मुलगी /पत्नी आहे, असे प्रमाणित करण्यात येत आहे.

**पुरावा :** १. --------------------------------- (नाव व स्वाक्षरी)

२. --------------------------------- (नाव व स्वाक्षरी)

**ठिकाण :** **स्वाक्षरी :**
**दिनांक :** **हुद्दा :**

**टिप :**

१. जे अर्जदार भूमीहीन शेतमजूर कुटुंबातील आहेत असा दावा करतात व ज्यांचे कुटुंबाचे निव्वळ उत्पन्न शेतमजूरीवरच आहे, अशांसाठी हे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

२. हे प्रमाणपत्र अर्जदाराच्या किंवा त्यांच्या नातेवाईकांच्या नावाने असल्यास अधिभार देण्याच्या दृष्टीने ग्राह्रय धरले जाणार नाही.

३. ह्रया प्रमाणपत्रात संबंधीत शेतमजूर ज्या जमीनधारकाच्या शेतावर काम करतात त्या जमीनधारकाचे संपूर्ण नांव इत्यादी सर्व तपशील नमूद करणे आवश्यक आहे. अन्यथा यासंबंधी अधिभार देता येणार नाही.

## परिशिष्ट ' ब '

## शेतकरी असल्याचा दाखला

**(तहसीलदार अथवा नायब तहसीलदार यांचे स्वाक्षरीचा)**

दाखला देण्यात येतो की, श्री /कुमार / श्रीमती ------------------------------------------------------ (अर्जदाराचे नाव) यांचे श्री /श्रीमती ------------------------------------------------------------ आई /वडील /आजोबा /आजी (पितृ कुलाकडील) (जमीनधारक) राहणार ------------------------------------- तालुका ----------------- जिल्हा ----------------------------- हे जमीनमालक या नात्याने धारण ------------- हेक्टर ----------------- आर ---------------------- इतकी जमीन धारण करतात आणि त्याने किंवा तिने धारण केलेली जमीन -------------------------------- कायदा ------------------------------ प्रमाणे मर्यादित आहे.

असेही प्रमाणित करण्यात येते की, ते /त्या स्वत: शेती करीत असून त्यांचे शेती हेच उत्पन्न हे प्रमुख उत्पन्नाचे साधन आहे.

**ठिकाण :**
**दिनांक :**

**स्वाक्षरी :**-----------------------

**नाव :**-----------------------

**स्वघोषित प्रमाणपत्र**

**(प्रवेश घेणा-या अर्जदाराने भरुन द्यावयाचे प्रमाणपत्र)**

**(प्रवशे घेते वेळी संबधित कृषि तंत्र विद्यालय / कृषि तंत्र निकेतनांत जमा करावे)**

मी कुमार /कुमारी ------------------------------------------------------------ कृषि तंत्र पदविका /कृषि तंत्र निकेतनाच्या अभ्यासक्रमाबाबतचे शैक्षणिक वर्षे २०२५ -२६ ची माहिती पुस्तिका संपूर्ण वाचली असून माहिती पुस्तिकेतील सर्व नियम / अटी /शर्ती मला मान्य आहेत.

**ठिकाण :**
**दिनांक :**

**अर्जदार स्वाक्षरी :-----------------------**

**संपूर्ण नाव :-----------------------**

## वैद्यकीय दाखला

(सक्षम नोंदणीकृत वैद्यकीय अधिकाऱ्याने जारी केलेला)

**(दैनंदिन कामकाज किंवा अध्ययनास पात्र असल्याचा दाखला).**

**(प्रवेशानंतर सादर केला तरी चालेल)**

मी प्रमाणित करतो की, कुमार /कुमारी -------------------------------------------------------- याची /हिची संपूर्ण वैद्यकीय तपासणी केली आहे व त्यावरुन खालीलप्रमाणे दाखला देत आहे.

- त्याला / तिला काहीही दृष्टीदोष नाही.
- त्याला / तिला श्रवणशक्तीचा कुठलाही त्रास नाही.
- त्याला / तिला कुठलाही आजार नाही, शारीरिक व्यंग किंवा मानसिक वैगुण्य नाही. जेणेकरुन सध्या किंवा भविष्यात तो / ती दैनंदिन कामकाज किंवा अध्ययनास (शेतावरील किंवा प्रयोगशाळेतील कामास) अपात्र ठरेल.

**(अर्जदाराची स्वाक्षरी)** **नोंदणीकृत वैद्यकीय अधिका-याची स्वाक्षरी**

**ठिकाण :** **नाव : --------------------**
**दिनांक :** **नोंदणी क्रमांक :---------------------**

**टिप :**

१. वैद्यकीय प्रमाणपत्र वरील विहित नमुन्यातच सादर करावे.

२. वैद्यकीय अधिकारी शासकीय सेवेत असल्यास दाखल्यावर कार्यालयाचे सील असणे आवश्यक आहे.